रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड

गुरुवार । दि. २३ जुलै २०२६ । अंक ४७ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

पाहिजेत

रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण - सासवणे.

संपर्क : ९६०७१०२३५७

# संतप्त तरुणाईचा एल्गार



● (छायाचित्र : समीर मालोदे)

## दिल्लीतील घटनेचे अलिबागमध्ये पडसाद

## शिक्षणमंत्र्यांसह गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा; शेकापची मागणी

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाचे पडसाद आता रायगड जिल्ह्यातही उमटू लागले आहेत. जिल्ह्यातील विविध भागांत शेतकरी कामगार पक्ष, सामाजिक संस्था आणि विद्यार्थी संघटनांनी निषेध आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. मंगळवारी (दि.२२) अलिबागमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली एल्गार आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी तसेच विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट परीक्षेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला शेकापने जाहीर पाठिंबा दिला. विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ तसेच सोनम वांगचुक, अभिजीत दिपके आणि युवकांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी अलिबागमधील चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृह मैदानावर निषेधसभा घेण्यात आली.

यावेळी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, जिल्हा सहचिटणीस अ‍ॅड. गौतम पाटील, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल शांताराम पाटील, अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेतकरी संघटना तालुका प्रमुख अनिल गोमा पाटील, पंचायत समिती सदस्य अंजली ठाकूर, मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी, नगरसेवक अनिल चोपडा, अ‍ॅड. परेश देशमुख, अ‍ॅड. किशोर हजारे, माजी नगरसेविका •> पान २ वर

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

## वेधक

### इरसाल गडावर दोन पर्यटक अडकले

**रसायनी :** इरसाल गडावर दोन पर्यटक अडकले आहेत त्यांना मदतीची आवश्यकता आहे, असा मेसेज आला, आणि १९ जुलैची इरसालवाडी दुर्घटनेची आठवण ताजी करून गेली, आणि सर्वांचा थरकाप उडाला, पण वयोवृद्ध कमळू पारधी, कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील यांनी गड चढून त्यांची सुटका केली. ठाणे येथील दोन युवक निखिल शिंदे (वय वर्ष २०) आणि तन्मय शिंदे (वय वर्ष १६) राहणार ठाणे चंदनीवाडा हे आज खालापूर तालुक्यातील इरसाल वाडीवर पर्यटनासाठी आले होते. धो-धो पाऊस पडत होता. सोसायट्याचा वारा,पाऊस आणि धुक्याची चादर ज्यामुळे समोरचे दिसत नव्हते, असे वातावरण निर्माण झाले होते. हे चित्र असल्याने युवक घाबरलेले आणि रस्ता चुकले, पुढे पाय टाकावा तर दरड त्यामुळे अपघाताची •> पान २ वर

### आसाममध्ये महापुराचा हाहाकार!

**आसाम :** आसाममध्ये मुसळधार पावसामुळे पूरस्थिती गंभीर बनली आहे. गेल्या २४ तासांत पूराशी संबंधित विविध घटनांमध्ये २१ जणांचा मृत्यू झाला असून, लाखो नागरिकांना या आपत्तीचा फटका बसला आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, राज्यातील अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून शिवसागर, डिब्रुगढ, जोरहाट, गोलाघाट, चराईदेव, धेमाजी, तिनसुकिया, नगाव, बिस्वनाथ, कामरूप आणि कार्बी आंगलाँगसह एकूण १६ जिल्हे पुराच्या विळख्यात सापडले आहेत. या पूरामुळे राज्यातील ५.६४ लाखांहून अधिक नागरिक प्रभावित झाले आहेत.

### लाल चौकात दहशतवादी हल्ला

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील लाल चौक परिसरात बुधवारी दुपारी दहशतवाद्यांनी पोलिस पथकावर हल्ला केला. या हल्ल्यात अमरनाथ यात्रेच्या सुरक्षा ड्युटीवर तैनात असलेले हेड कॉन्स्टेबल आशिक हुसेन गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या हल्ल्याची जबाबदारी लष्कर-ए-तैयबाशी संबंधित द रेसिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेने स्वीकारल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. हल्ल्यात किती दहशतवादी सहभागी होते याचा तपास सुरू आहे.

## महाराष्ट्र हुकूमशाहीपुढे झुकणार नाही : चित्रलेखा पाटील



नीट पेपरफुटीने लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर घाला घातला आणि न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना लाठ्यांनी उत्तर देण्यात आले. ही लोकशाही नव्हे, तर सत्तेची दडपशाही आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा आहे. शाहू, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र अन्यायासमोर कधीही झुकलेला नाही आणि झुकणारही नाही. पेपरफुटीला जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत शेतकरी कामगार पक्षाचा संघर्ष सुरूच राहील, असा इशारा शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला.

## अन्यायाविरोधात लढण्याची देशांमधील युवकांमध्ये ताकद : सुरेश घरत





डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला न्याय, स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. त्या अधिकारांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करणे ही लोकशाहीला न शोभणारी बाब आहे. हा प्रकार निषेधार्ह असून देशातील तरुण आता जागा झाला आहे, असे प्रतिपादन शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केले. तरुणांच्या आवाजाला दडपण्याचा प्रत्येक प्रयत्न उलट त्यांचा निर्धार अधिक मजबूत करेल. विद्यार्थ्यांवर लाठी चालवून प्रश्न संपणार नाहीत. अन्यायाविरोधात लढण्याची आणि परिवर्तन घडवून आणण्याची ताकद युवकांमध्ये आहे. संविधानाच्या चौकटीत राहून आंदोलन करणाऱ्यांना देशविरोधी ठरविण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाहीसाठी धोकादायक आहे. देशासाठी बलिदान देणाऱ्यांच्या वारसांनाही अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर हा गंभीर चिंतेचा विषय आहे. अशा प्रवृत्तींना लोकशाही मार्गाने उत्तर देण्याची जबाबदारी आजच्या तरुणांवर आहे. रायगडमधील आंदोलनाचा उल्लेख करत सुरेश घरत म्हणाले, अलिबागमध्ये आंदोलनादरम्यान पोलिसांनी संयमाची भूमिका घेतली, याचे स्वागत केले पाहिजे. मतभेद असले तरी लोकशाहीत संवाद आणि संयम यालाच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी सुरू असलेल्या प्रत्येक लोकशाहीवादी लढ्यात शेतकरी कामगार पक्ष ठामपणे सहभागी राहील.

## तरुणांनो जागे व्हा, रात्र वैऱ्याची : अ‍ॅड. मानसी म्हात्रे



नीट पेपर फुटीविरोधात तरुणांनी दिल्लीच्या संसद भवनमध्ये दाद मागण्याचा प्रयत्न केला. हा लढा देशाच्या भविष्यासाठी, न्याय हक्कासाठी, आपले हक्क रोखण्याविरोधातील होता. मात्र या सरकारने पोलीस बळाचा वापर करीत लाखो तरुणांवर अमानुषपणे लाठी हल्ला केला. ही घटना अतिशय निंदनीय आहे. तरुणांनो जागे, व्हा, रात्र वैऱ्याची आहे. संविधानावर आणि लोकशाहीवर घाला घालणाऱ्यांना त्यांची जागा दाखविण्याची वेळ आली आहे. देशाचा कारभार सुशिक्षितांनाच हाती घ्यावा लागणार आहे, असे आवाहन शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी केले. नीट परीक्षा झाल्याशिवाय वैद्यकिय क्षेत्रातील अभ्यासक्रमासाठी पात्र ठरवता येत नाही. १ लाख ७६३ जागांसाठी २५ लाख विद्यार्थी ही परीक्षा देतात. नीट पेपर फुटीमुळे आज २५ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे. पेपर फुटीमळे परीक्षा रद्द करण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचे स्वप्न भंगल्याची घणाघाती टीका अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांनी केली.

## चार दिवसांत वीरेश्वर मंदिर चोरीचा उलगडा



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोलीतील वीरेश्वर मंदिरातील धाडसी चोरीचा अवघ्या चार दिवसांत उलगडा करण्यात खोपोली पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून, चोरीला गेलेले सुमारे १७ किलो वजनाचे चांदीचे आच्छादनही लवकरच हस्तगत होण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

१८ जुलै रोजी पहाटे तीन वाजण्यापूर्वी अज्ञात चोरट्यांनी वीरेश्वर मंदिरात प्रवेश करून शिवपिंडीवरील सुमारे १७ किलो वजनाचे चांदीचे आच्छादन चोरून नेले होते. या घटनेमुळे खोपोलीसह संपूर्ण रायगड जिल्ह्यातील भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली.

खोपोली पोलिसांच्या तीन विशेष पथकांनी रात्रंदिवस तपास करत तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज, गुप्त माहिती आणि स्थानिक नेटवर्कच्या आधारे आरोपींचा माग काढला. या तपासादरम्यान •> पान २ वर

## रोह्यातील सदनिकेला आग

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहे शहरातील सेवादळ आळी येथील स्वामी हेरिटेज अपार्टमेंटच्या तिसऱ्या मजल्यावरील एका सदनिकेला बुधवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास आग लागली. भरवस्तीत ही घटना घडल्याने परिसरातील रहिवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली. मदतकार्यात माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगराध्यक्षा वनश्री शेडगे, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी, पोलीस अधिकारी तसेच •> पान २ वर

## महसूल शिबिरात व्यासपीठावर ‘डुलकी’

### पेणमध्ये प्रशासन चर्चेत; अंगणवाडी सेविकांची पुन्हा फरफट

**। पेण । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त महसूल विभागाच्या वतीने पेण येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. योजनांपेक्षा कार्यक्रमातील काही घडामोडींनी उपस्थितांचे अधिक लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाला मोठी गर्दी झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र, उपस्थितांमध्ये पुन्हा एकदा अंगणवाडी सेविकांनाच कार्यक्रमाला बोलावण्यात आल्याची चर्चा रंगली. विविध विभागातील कर्मचारी आणि अंगणवाडी सेविकांच्या •> पान २ वर





### भाजप नेत्याच्या भाषणाप्रसंगी झोप अनावर

पेण येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले या व्यासपीठावर डुलकी घेत असल्याचे दृश्य उपस्थितांच्या नजरेत भरले. मान्यवरांची भाषणे सुरू असतानाच त्या काही वेळ डुलक्या घेत असल्याचे उपस्थितांनी पाहिल्याची चर्चा कार्यक्रमस्थळी रंगली. या घटनेची छायाचित्रे आणि व्हिडिओ काही उपस्थितांनी टिपल्याचेही बोलले जात होते. त्यामुळे कार्यक्रमानंतर शासकीय योजनांपेक्षा व्यासपीठावरील या प्रसंगाचीच अधिक चर्चा झाली. उपस्थितांपैकी काहींनी या दृश्यावर आश्चर्य व्यक्त केले, तर काहींमध्ये हलकाफुलका हशाही पिकल्याचे सांगण्यात आले.

**दादांच्या कार्याचा केला गौरव** | **नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण**

## अजित पवार यांना अभिवादन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अलिबाग नगरपरिषदेत बुधवारी (दि.२२) अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगरपरिषदेच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे, सभापती प्रशांत नाईक यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.



यावेळी अजित पवार यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाचा गौरव करण्यात आला. राज्याच्या पायाभूत सुविधा, स्थानिक स्वराज्य संस्था, जलसंधारण, ग्रामीण विकास आणि प्रशासनातील निर्णयक्षम नेतृत्वामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिल्याचे नमूद करण्यात आले. जनतेच्या प्रश्नांबाबत संवेदनशील राहून जलद निर्णय घेणारे नेतृत्व म्हणून अजितदादा पवार यांची ओळख कायम स्मरणात राहील, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

याप्रसंगी नगराध्यक्षा अक्षया नाईक म्हणाल्या की, “दिवंगत अजितदादा पवार यांनी विकासाला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. लोकाभिमुख प्रशासन, निर्णयक्षम नेतृत्व आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान कायम प्रेरणादायी राहील. त्यांच्या •> पान २ वर

## समुद्रातही आता ‘फुल नेटवर्क’

### मच्छिमारांना सॅटेलाइट फोनची सुविधा; खराब हवामानातही संपर्क कायम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारी करताना कोणत्याही परिस्थितीत किनाऱ्याशी संपर्क साधता यावा, आपत्कालीन प्रसंगी तात्काळ मदत मिळावी तसेच हवामान आणि सुरक्षा विषयक सूचना वेळेवर मिळाव्यात, यासाठी महाराष्ट्र शासनाने सॅटेलाइट फोन सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

मच्छिमार सुरक्षा प्रथम या धोरणाअंतर्गत समुद्रातील संप्रेषण अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर शासनाचा भर आहे. सॅटेलाइट फोनमुळे मोबाईल नेटवर्क नसलेल्या खोल समुद्रातील भागातही मच्छिमारांचा किनाऱ्याशी अखंड संपर्क राहणार असून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मागविणे शक्य होणार आहे.

बीएसएनएलच्या सहकार्याने ही सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक असून त्यामुळे समुद्रातील सुरक्षा, संप्रेषण आणि बचावकार्य अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे. सॅटेलाइट फोनच्या माध्यमातून खराब हवामान, यांत्रिक बिघाड, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती किंवा इतर संकटांच्या वेळी मच्छिमारांना तात्काळ मदत मागविता येणार आहे. तसेच हवामानातील बदल आणि सुरक्षा इशारेही वेळेवर मिळणार असल्याने अपघातांचा धोका कमी होण्यास मदत होईल. या निर्णयामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांचा आत्मविश्वास वाढेल आणि मत्स्यव्यवसाय अधिक सुरक्षित, आधुनिक व तंत्रज्ञानाधारित होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, या निर्णयाचे महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा मच्छिमार सहकारी सोसायटीचे उपाध्यक्ष आणि मुरूड सागरकन्या मच्छिमार सोसायटीचे अध्यक्ष मनोहर बैले यांनी स्वागत केले असून, मच्छिमारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# स्वच्छता अधिभार;अस्वच्छ आगार

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांना स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी १ जूनपासून राज्यव्यापी स्वच्छता मोहीम सुरू केली. त्यासाठी प्रवाशांकडून दोन रुपये अधिभार आकारला जा-तो. दररोजच्या ५० लाख प्रवाशांकडून एक कोटी रुपये केवळ स्वच्छतेसाठी जमा होतात. राज्यभरातील ५६० हून अधिक बस आगार, स्वच्छतागृहे, बसस्थानक परिसर आणि एसटी बसची नियमित स्वच्छता करण्याचे काम एका खासगी कंपनीकडे सोपविण्यात आले आहे. स्वच्छता मोहीम सुरू होऊन दीड महिना उलटला तरी अनेक आगारातील परिस्थिती पूर्वीसारखी आहे. पावसाळ्यात ही दुरावस्था आणखी वाईट झाली आहे.



राज्याच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असलेल्या एसटीच्या दररोज सुमारे १४ हजार बस रस्त्यावर धावतात. जवळपास ५० लाख प्रवासी दररोज एसटीने प्रवास करतात. डेपो आणि बसस्थानकांच्या स्वच्छतेसाठी महामंडळ प्रत्येक तिकिटामागे दोन रुपयांचा अधिभार आकारते. या माध्यमातून एसटीला सुमारे एक कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळते. हा निधी ज्या उद्देशाने गोळा केला जातो, त्या प्रमाणात प्रवाशांना स्वच्छतेचा लाभ मिळत नाही. पावसाळ्यात या स्वच्छतेची तीन तेरा वाजले आहेत.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही स्वच्छता चांगली व्हावी यासाठी संसद सारखी उच्च दर्जाची वास्तू स्वच्छ करणाऱ्या कंपनीच्या उपकंपनीला हे काम देण्यात आले आहे.

राज्यातील अनेक बसस्थानकांमध्ये स्वच्छतागृहांची दुरवस्था कायम आहे. दुर्गंधी, पाण्याचा निचरा न होणे, अस्वच्छ फरशी, तुटलेली स्वच्छता उपकरणे आणि कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ बेसिन, शौचालयातील अस्वच्छता पाहून अनेक प्रवाशांना ओकारी येते, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी पाहायला मिळते. पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

चिखल, साचलेले पाणी आणि अस्वच्छ परिसरामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना सर्वाधिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

बसस्थानकांचा परिसर, बस फलाट, प्रतीक्षालये तसेच अनेक एसटी बसच्या आतील स्वच्छतेबाबतही प्रवाशांकडून सातत्याने तक्रारी होत आहेत. स्वच्छता मोहिमेची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी तफावत असल्याचे चित्र अनेक आगारात दिसून येत आहे. स्वच्छतेसाठी आकारण्यात येणाऱ्या अधिभाराचा वापर नेमका किती प्रभावीपणे होत आहे, याबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी १ ऑगस्ट रोजी एसटीच्या स्वच्छता मोहिमेचा आढावा घेण्यासाठी बैठक बोलावली आहे. या बैठकीत स्वच्छतेसाठी नियुक्त खासगी संस्थेच्या कामगिरीचा आढावा, अधिभारातून जमा झालेल्या निधीचा वापर, आगारातील प्रत्यक्ष स्वच्छतेची स्थिती, पुढील सुधारात्मक उपाययोजनांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीनंतर स्वच्छता मोहिमेची प्रत्यक्ष परिणाम कारकता वाढविण्यासाठी कोणते निर्णय घेतले जातात, याकडे प्रवासी आणि एसटी कर्मचारी यांचे लक्ष लागून राहिले आहे.

## मनाचे श्लोक पाठांतर स्पर्धा

। पनवेल । प्रतिनिधी ।

श्री समर्थ भारत अभियान, पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने राज्यस्तरीय श्री मनाचे श्लोक पाठांतर आणि सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत लहान बालकांपासून ते प्रौढांपर्यंत सर्व वयोगटातील इच्छुकांना सहभागी होता येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

ही स्पर्धा शालेय, आंतरशालेय आणि राज्यस्तरीय अशा तीन टप्प्यांत पार पडणार आहे. शालेय स्तरावरील स्पर्धा ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात, आंतरशालेय स्पर्धा दिवाळीनंतर, तर अंतिम राज्यस्तरीय स्पर्धा जानेवारी २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे.

समर्थ रामदास स्वामी रचित श्री मनाचे श्लोकफ पाठांतर तसेच सूर्यनमस्कार या दोन प्रकारांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या स्पर्धकांना पारितोषिके, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे. स्पर्धेत अधिकाधिक विद्यार्थी, पालक व नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री समर्थ भारत अभियानाच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क प्रा. श्रद्धा कौस्तुभ तारे, विभाग प्रमुख, श्री समर्थ भारत अभियान, पनवेल विभाग येथे साधावा.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे धाकटे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक संकेत जनार्दन भासे व प्रविण सरदारमल ओसवाल यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २३ | ६ | ०-१५-२० | २-१२ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २३/०७/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३


# आरोपीला दहा वर्षांची सक्त मजूरी

**● माणगाव सत्र न्यायालयाचा आदेश**

। माणगाव । प्रतिनिधी।

महिलेच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची हत्या करणाऱ्या आरोपीला माणगाव सत्र न्यायालयाने १० वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा सुनावली, आणि दंडही ठोठावला. राम नथु जाधव असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

रोहा तालुक्यातील वराठी आदिवासी वाडीवर घडली होती. मयत महिला आणि राम नथु जाधव हे दोघे पाच वर्षांपासून एकत्र राहत होते. मोलमजूरी करून दोघेही आपला चरितार्थ चालवत होते. राम जाधव हा सदर महिलेच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यावरून त्यांच्यात वाद विवाद होत होते. याच कारणावरून त्याने महिलेला बांबूच्या काठीने आणि कोयत्याने मारहाण केली होती. ज्यात महिलेचा मृत्यू झाला. दरम्यान दोघांचे भांडण सोडविण्यासाठी शेजारी राहणारी महिला तिथे गेली. मात्र आरोपी जाधव याने त्या महिलेला देखील बांबूने मारहाण केली. ज्यात ती जखमी जखमी झाली.

या प्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी या गुन्ह्याचा तपास करत होते. परिस्थिती जन्य पुरावे, शवविच्छेदन अहवाल आणि तांत्रिक तपास करून सुर्यवंशी यांनी आरोपी राम नथु जाधव याच्या विरोधात माणगाव सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या खटल्याची सुनावणी अतिरीक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. के. पाटील यांच्या न्यायालयासमोर झाली. सरकारी वकील म्हणून योगेश तेंडूलकर यांनी युक्तीवाद केला. सुनावणी दरम्यान तपासिक अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि राम जाधव याच्या मारहाणीत जखमी झालेली महिला यांच्या साक्षी महत्वपूर्ण ठरल्या. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकल्यानंतर आणि सबळ पुराव्याच्या निश्चितीनंतर न्यायालयाने आरोपी राम जाधव याला हत्या आणि मारहाण प्रकरणात दोषी ठरवले. आरोपीला दहा वर्ष सक्त मजूरी आणि १ हजार रुपयांचा दंडही ठोठावला. दंड न भरल्यास एक महिनाचा अतिरीक्त साधा कारावासाची शिक्षा सुनावली. या निकालाकडे रोहा तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते.



## वृक्षारोपण बनले काळाची गरज

। माथेरान। प्रतिनिधी ।

जुलै महिन्यापासूनच खऱ्या अर्थाने माथेरानमध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर पावसाने बॅटिंग सुरू केली असून या अतिवृष्टीमध्ये असंख्य झाडे मुळासहित उन्मळून पडल्याने काही भाग ओसाड दिसू लागले आहेत. वृक्षवल्ली हीच खरी माथेरानची ओळख असल्यामुळे हळूहळू ही वनसंपदा नष्ट झाल्यास इथं कुणीही फिरकणार नाही. हवेत गारवा नसेल, चोहोबाजूंनी हिरवाई नसेल तर पर्यटन धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी पासून गावातील महात्मा गांधी मार्गावरील रस्त्यालगत असणारी बहुतांश झाडे सुकत चालली असून केव्हाही पडू शकतात.ही बाब लक्षात घेऊन या पावसाळ्यात वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असल्याचे बोलले जात आहे.

पॉईंट्स ठिकाणी सुध्दा अनेक झाडे वादळी वाऱ्याने पडली आहेत. अद्यापही या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम कोणत्याही राजकीय पक्षांनी, तसेच सेवाभावी संस्थांनी, वनखात्याने हाती घेतलेला नाही. सात महिने उलटूनही वन संरक्षण समिती अद्याप कार्यरत झालेली नसल्याने यावर्षी वन समितीच्या माध्यमातून वृक्षारोपण होईल की नाही याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.


### जाहीर नोटीस

जाहीर सुचना देण्यात येते की, आज रोजी खाली नमूद जमिन मिळकत मे. श्री सिद्धिविनायक एंटरप्रायझेस, च्या वतीने भागीदार १. श्रीमती. कृपा अनिल पाटील व २. श्री. रामदास किसन महारनवर यांच्या नावे असुन त्यांचा पत्ता ए-६०/१०, सेक्टर २१, वाशी-तुर्भे मुख्य रस्ता, तुर्भे, नवी मुंबई, जि. ठाणे-४००७०५ असा आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ४३ | ब | ४८-५६-०० | ९७.९२ |

वर उल्लेखित मिळकत वर नमूद मालकांनी आमचे अशिलांशी विकसन करण्यापोटी देण्याचे ठरविले असून त्याबाबत टायटल सर्टिफिकेट आणि सर्च रिपोर्ट घेणेबाबत आमचे अशिल यांनी आम्हाला विनंती केली असल्याने आम्ही त्यास मान्यता दिलेली आहे.

परंतु तत्पूर्वी सदर मिळकतीसंदर्भात जर कोणाही व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिन भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत सादर करावे आणि जर तसे केले नाही तर सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे, असे गृहित धरून आम्ही आमच्या अशिलांना सदर मिळकत ही चोख व मार्केटेबल आहे असे टायटल सर्टिफिकेट देवू. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच वर नमूद कालावधी समाप्त झाल्यानंतर उभयपक्षी यांच्यामध्ये विकसन करारनामा नोंदणीकृत करण्यात येईल.

सही- **ॲड. अभिमन्यू जाधव**
पत्ता- गाळा क्र. ११ व १२, तळ मजला,
बिल्डिंग नं. २, श्री. साई श्रद्धा को. ऑप. हौ.सो.लि.,
प्लॉट नं. १२, सेक्टर १७, नविन पनवेल (प.),
ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६
दिनांक : २३/०७/२०२६


पान १ वरून

## इरसाल गडावर दोन पर्यटक अडकले

शक्यता, त्यामुळे त्यांना मदतीची गरज होती, त्यांनी जागचे हलायचे नाही असे ठरवून त्यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.११२ नंबरवर फोन करून मदतीची गरज व्यक्त केली आणि चौकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी स्थानिक पोलीस, कमलू पारधी, निखिल मालुसरे, कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील, गाव पोलीस पाटील यांच्या मदतीने या दोन तरुणांना सुरक्षित खाली उतरवून आणले. १९ जुलै २०२६ रोजी इरसाल वाडीच्या दुर्घटनेला तीन वर्षे पूर्ण झाली. ही आठवण देणारी घटना ताजी असताना असा प्रसंग समोर आल्याने पोलिसांची तारांबळ झाली होती. चौक दोन तरुण निखिल मालुसरे आणि स्वप्निल सोनटक्के हे घटनाक्रमावर लक्ष ठेवून होते, कौस्तुभ कुंभार हा तरुण आविष्कार पाटील याला घेऊन इरसाल वाडी वर मदतीसाठी गेला. सर्वांशी संपर्क झाल्याने हा रेस्क्यू ऑपरेशन अत्यंत कमी वेळात आणि कुशलतेने पार पडले, सर्वांचा जीव भांड्यात पडला.कमळू पारधी वय वर्ष ८० फक्त .१९ जुलै २०२३ रोजी घडलेल्या दुर्घटनेत कमळुदादा याच्या कुटुंबातील पाच सदस्य काळा आड गेले तरीही नेहमीच प्रत्येक शोधकार्यात निस्वार्थ मदत करत असतात तसेच पावसाची तमा न बाळगता गडावर पोहचुन कौस्तुभ कुंभार व सहकारी यांच्यासह दोन पर्यटकांना सुखरूप घेऊन आले.चौक सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी कमलू पारधी, कौस्तुभ कुंभार, आविष्कार पाटील यांचा सन्मान केला.

## चार दिवसात वीरेश्वर मंदिर चोरीचा उलगडा

पुणे जिल्ह्यातील शिरूर येथून दोन, तर अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथून दोन अशा एकूण चार आरोपींना २१ जुलै रोजी संध्याकाळी अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अमोल सुरेश कसबे व विलास साहेबराव आगीवाले (रा. शिरूर, जि. पुणे) तसेच दिलीप राजू जाधव व सखाराम छबन गायकवाड (रा. पारनेर, जि. अहिल्यानगर) यांचा समावेश आहे. चौघांनाही पुढील तपासासाठी खोपोली पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे.पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, चोरीला गेलेले १७ किलो वजनाचे चांदीचे आच्छादन लवकरच जप्त करण्यात येण्याची शक्यता असून, त्यादृष्टीने तपास सुरू आहे.

या गुन्ह्याच्या तपासासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन मंदिर विश्वस्तांशी चर्चा केली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली पोलीस, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, खालापूर पोलीस, रसायनी पोलीस, खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासह रायगड पोलिसांची आठ पथके तपासात सहभागी होती. यामध्ये पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखालील खोपोली पोलिसांच्या तीन पथकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.अवघ्या चार दिवसांत गुन्ह्याचा उलगडा करून आरोपींना अटक करण्यात आल्याने भाविकांनी खोपोली पोलिसांच्या तत्पर कारवाईचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे.

## अजित पवार यांना अभिवादन

कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जनतेच्या सेवेसाठी अधिक जबाबदारीने कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.'' असे त्यांनी सांगितले. सभापती प्रशांत नाईक यांनीही आपल्या भावना व्यक्त करत सांगितले, ''अजितदादा पवार हे दूरदृष्टी असलेले, अभ्यासू आणि कार्यक्षम नेतृत्व होते. त्यांनी विकासाची जी परंपरा निर्माण केली, ती पुढे नेणे ही प्रत्येक लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आम्ही त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करतो.'' त्यानंतर उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, ''दिवंगत अजितदादा पवार यांनी विकासाला दिलेली गती, प्रशासनातील शिस्त आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी ही प्रत्येक लोकप्रतिनिधीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून जनतेच्या सेवेसाठी निष्ठेने कार्य करणे, हेच त्यांच्या स्मृतींना खरे अभिवादन ठरेल.''

या कार्यक्रमात उपस्थित नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत नागरिकाभिमुख आणि विकासकेंद्री प्रशासन उभारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संतप्त तरुणाईचा एल्गार

संजना कीर, निलेश खोत, संदीप गायकवाड, सुरेश खोत, नागेश कुलकर्णी, दीपक पाटील, काँग्रेसचे आकाश राणे, पुरोगामी संघटनांचे तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, विद्यार्थी संघटना अध्यक्ष वेदांत कंटक, सोनाली मोरे, नागेश्वरी हेमाडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी केली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनादरम्यान शेकापचे जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. उपस्थितांनी लोकशाही मूल्यांचे संरक्षण, संविधानावरील निष्ठा आणि विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## महसूल शिबिरात व्यासपीठावर 'डुलकी'

उपस्थितीमुळे कार्यक्रमाला मोठी गर्दी झाल्याचे बोलले जात होते. यापूर्वीही अशा शासकीय कार्यक्रमांमध्ये अंगणवाडी सेविकांच्या उपस्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. दरम्यान, व्यासपीठावर उपस्थित असलेलल्या रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यक्रम सुरू असताना काही काळ डुलकी घेत असल्याचे दृश्य उपस्थितांनी मोबाईलमध्ये कैद केले.त्यामुळे कार्यक्रमानंतर शासकीय योजनांपेक्षा सीईओंची डुलकी याच विषयाची अधिक चर्चा रंगली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मार्गदर्शन करताना रायगड जिल्ह्यातील सामाजिक स्थितीचा उल्लेख केला.

रायगड जिल्ह्यात हुंडाबळीची प्रकरणे होत नाहीत तसेच माझ्या कार्यकाळात शेतकरी आत्महत्येची घटना घडलेली नाही, असे ते म्हणाले. लॅप्टोस्पायरोसिसच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना गमबूट वाटपाचा निर्णय राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य, सामाजिक न्याय, महिला व बालविकास आदी विभागांच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे, मंजुरीपत्रे आणि इतर साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच वनहक्क, आर्थिक सहाय्य, बचत गट लाभ, नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई, पीएम स्वामित्व योजना, दिव्यांग व अंध कल्याण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, कृषी विभागाच्या विविध योजना, आयुष्यमान भारत कार्ड आदी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना देण्यात आला. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर उपस्थितांमध्ये शासकीय शिबिरातील व्यवस्थापन, अंगणवाडी सेविकांची झालेली फरफट आणि व्यासपीठावरील डुलकी याच मुद्द्यांवर अधिक चर्चा सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## रोह्यातील सदनिकेला आग

स्थानिक नागरिक सहभागी झाले. या आगीत सदनिकेतील साहित्याचे आर्थिक नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जिवितहानी झाली नाही. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याचा तपास सुरू आहे. दरम्यान, या परिसरात वारंवार कमी-अधिक दाबाने वीजपुरवठा होत असल्याने विद्युत उपकरणे निकामी होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. त्यामुळे या आगीचा संबंध विद्युत बिघाडाशी आहे का, याबाबतही तपास यंत्रणा चौकशी करत आहे.

## बोगद्यात भूस्खलन, २० कामगारांचा मृत्यू

**सिक्कीम :** सिक्कीममधील एनएचपीसीच्या जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात अडकलेल्या २५ कामगारांपैकी २० जणांचे मृतदेह मंगळवारी रात्री उशिरा बाहेर काढण्यात आले. उर्वरित पाच कामगारांपर्यंत बचाव पथके रात्री उशिरापर्यंत पोहोचू शकली नाहीत. हे कामगार बोगद्यात वेगवेगळ्या ठिकाणी अडकले होते. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी पथके २४ तास काम करत होती, परंतु बोगद्यात मिथेन वायू भरल्यामुळे अनेक बचाव पथके बेशुद्ध पडली. हा नामची जिल्ह्यातील समरदुंग-झोलुंगाय येथे बांधण्यात येत असलेल्या तीस्ता स्टेज-६ प्रकल्पाचा भाग असलेला आदित-३ बोगदा आहे. याचे बांधकाम पटेल इंजिनिअरिंग कंपनी करत होती.

## टॅक्सी चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन

। पनवेल । प्रतिनिधी।

खारघर-तळोजा परिसरात प्रवाशी वाहतूक करणाऱ्या टॅक्सी चालकांनी प्रवाशांशी सौजन्याने वागतानाच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन वाहतूक पोलीस अधिकारी भरत थिटे यांनी केले आहे.

तळोजा येथील शीघ्र कृती दल परिसरापासून खारघर मधील बेलपाडा भागापर्यंत मोठ्या प्रमाणात टॅक्सी सेवा सुरु असून, दररोज शेकडो प्रवासी या सेवेचा लाभ घेत आहेत. मात्र, काही टॅक्सी चालक टाटा मेमोरियल रुग्णालय दिशेने जाताना सर्व्हिस रोडचा वापर करत असल्याच्या तक्रारी वाहतूक विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर वाहतूक पोलीस भरत थिटे यांनी टॅक्सी चालकांची बैठक घेऊन त्यांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. टॅक्सी बालकांसमवेत झालेल्या बैठकीत भरत थिटे यांनी टाटा हॉस्पिटलकडे आणि बेलपाडा येथे प्रवाशी घेवून जाताना खारघर-तळोजा या मुख्य रस्त्यानेच वाहतूक करावी, असे स्पष्ट निर्देश दिले.


### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सुचित करण्यात येते की, मी, माझे अशिलांचे वतीने, **श्री. पुष्कर प्रफुल्ल तेरडे व श्री. सागर सच्चितानंद बडवे**, जे खाली नमूद **परीशिष्टातातील** नमुद खुल्या जागेचे मालक आहेत यांच्या मालकी हक्काची (टायटल) तपासणी करत आहे.

खाली दिलेल्या परीशिष्टातील नमुद खुली जागा किंवा तिचा कोणताही भाग या संदर्भात सर्व व्यक्ती / संस्था ज्यामध्ये वैयक्तिक व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंब , कंपनी, बँक / बँका, वित्तीय संस्था, बिगर-बँकिंग वित्तीय संस्था, भागीदारी संस्था, व्यक्तींची संघटना किंवा व्यक्तींचा समूह (मग तो नोंदणीकृत असो वा नसो), कर्जदार आणि / किंवा धनको ज्यांचा खाली दिलेल्या परीशिष्टातील नमुद खुल्या जागेमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये वारसाहक्क, विक्री, हस्तांतरण, हिस्सा, तारण, गहाण, बोजा, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, वापर, भोगवटा, केअरटेकर हक्क, अभिहस्तांतरण, भाडेकरू हक्क, पोट-भाडेकरू हक्क, बक्षीस, अदलाबदल, बोजा/दायित्व, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, मृत्युपत्रान्वये मिळालेली मालमत्ता, उत्तराधिकार, मृत्युपत्र, मृत्युपत्राचा दस्तऐवज, प्रोबेट, मृत्युपत्रासह किंवा मृत्युपत्राशिवाय जारी केलेले प्रशासकीय पत्र (लेटर्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन), पोटगी, सुखाचार, ट्रस्ट, ताबा, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार / करारनामे, विकास हक्क, जाण्याचा हक्क, प्रलंबित वाद , आरक्षण, कुलमुखत्यारपत्र, पर्याय, एफएसआय वापर, प्रथम नकाराचा अधिकार (राईट ऑफ फर्स्ट रिफ्युझल), अग्रक्रयाधिकार किंवा कोणत्याही स्वरूपाचे दायित्व किंवा वचनबद्धता याद्वारे कोणताही लाभ, मालकी हक्क, दावा, आक्षेप, मागणी किंवा हक्क किंवा हितसंबंध आहेत; त्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **सात (७) दिवसांच्या** आत, आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ लेखी पुराव्यांच्या नोटरी प्रमाणित सत्य प्रतींसह, खालील स्वाक्षरीकारांना त्यांच्या कार्यालय **क्र. बी - २८, तळमजला, पटेल शॉपिंग सेंटर, चंदावरकर रोड, बोरीवली - पश्चिम, मुंबई - ४०० ०९२** या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे. तसे न केल्यास, असे मानले जाईल की खाली दिलेल्या परीशिष्टातील नमुद खुल्या जागेवर कोणत्याही तृतीय पक्षाचा दावा / आक्षेप / वाद अस्तित्वात नाही. तसेच, त्यानंतर कोणत्याही स्वरूपाचे दावे / आक्षेप / वाद विचारात घेतले जाणार नाहीत आणि दावा अथवा / किंवा हरकती काही असल्यास त्या त्यागीत किंवा परित्यागीत केल्याचे समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**परीशिष्ट खुल्या जागेचे तपशिल**

तुकडी जिल्हा रायगड पोट तुकडी व तालुका उरण तसेच जिल्हा परिषद रायगड व हरिश्चंद्र पिंपळे ग्रामपंचायत अधिकार क्षेत्रातील मौजे हरिश्चंद्र पिंपळे, तालुका - उरण, जिल्हा - रायगड येथील तलाठी सजा विंधणे यांचे हद्दीतील खालील वर्णनाची जमिन मिळकत:-

| गावाचे नाव मौजे | तालुका | जिल्हा | गट क्रमांक व उपविभाग | भूधाराना पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| हरिश्चंद्र पिंपळे | उरण | रायगड | ४३/७ | १ | जिरायत ०.२८.००<br>पो. ख. ०.०१.३०<br>एकूण ०.२९.३० | ४.२५ |

याची चतु:सीमा
पुर्वेस : सा. हि. नं. ८ हि मिळकत,
पश्चिमेस : सा. हि. नं. ३ हि मिळकत,
दक्षिणेस : सा. हि. नं. ३८ हि मिळकत व
उत्तरेस : सा. हि. नं. ४ हि मिळकत.

दिनांक - २३ जानेवारी, २०२६

हस्ताक्षर
**ब्रिजेश र. पाटील,**
**ॲडव्होकेट, हायकोर्ट बॉम्बे**



### नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटिस द्वारे कळवण्यात येते की खालीलप्रमाणे नमूद मौजे अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड येथील व्यापारी गाळा आमचे आशिल यांनी विद्यमान मालक श्री. किशोर दत्तात्रेय आग्रावकर यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू व्यापारी गाळा हा निर्विध असल्याचा भरवसा व्यापारी गाळा मालक यांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहारबाबत कोणाचाही कोणतीही हरकत,दावा,लिज,पोटगी,बक्षीसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलाकडे ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदपत्रांसह खाली सही करणेकडे हरकत सादर करावी.

सदर कालावधीत हरकत प्राप्त न झाल्यास अथवा प्राप्त हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींसाठी आम्ही जबाबदार राहणार नाही. तसेच पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड**

मौजे अलिबाग व अलिबाग नगरपरिषद च्या हद्दीतील सि.स.न १००१/१ ए १००१/१,१००१/१बी, १ बी व के १००१/१ या मिळकतीवर बांधलेल्या रजनी नारायण सह. गृहनिर्माण संस्था जे.एस.एम. कॉलेज रोड अलिबाग या इमारतीमधील तळ मजल्यातील व्यापारी गाळा क्र.८ क्षेत्र २१० चौ.फु. (१९.५१ चौ.मी) या व्यापारी गाळ मिळकतीचे अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र बी विंग १४७७ तळमजला नंबर ८ (अलिबाग नगरपालिका नवीन मालमत्ता नंबर Z1MKT001743 व जुना मालमत्ता नंबर - १४७७ ए)

दिनांक : २२/०७/२०२६

आपला विश्वासू,
**ॲड. आशिष अशोक बाणे**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
ऑफिस पत्ता - शॉप नंबर ०६ रजनी नारायण कॉम्प्लेक्स जे.एस.एम. कॉलेज जवळ अलिबाग
रायगड ४०२२०१ मोबईल नंबर-८००७०७२६६९



### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सौ. पायल मिथिल जैन, राहणार अलिबाग, ता.अलिबाग, यांच्या मालकीच्या मौजे बामणगाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मौजे बामणगाव, ता.अलिबाग, जि.रायगड येथिल भुमापन व उपविभाग क्र. १५४, क्षेत्र ०-५३-०० (हे.आर.), पो.ख. ०-०८-०० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०-६१-०० (हे.आर.), आकार रू. ०.९९ पैसे, ह्या शेतजमिन मिळकतीच्या खरेदी व्यवहारासंबंधीची जाहीर सुचना दिनांक १७/०६/२०२६ रोजीच्या दैनिक कृषिवल या वृत्तपत्रात जाहीर केलेली होती. काही तांत्रिक अडचणीमुळे जमिन मालक व माझे अशिल यांच्यामधील सदरील मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्णत्वास जावू शकणार नाही. माझ्या अशिलांस सदरील मिळकत खरेदी करण्यात कोणतेही स्वारस्य राहिलेले नाही, माझ्या अशिलांनी सदरील मिळकतीचा व्यवहार रद्दबातल केला असून, माझ्या अशिलांचा आता सदरील मिळकतीशी कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध राहिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २२/०७/२०२६.

सही /-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## निवडक



### पनवेलमध्ये विरोधी पक्षाचे आंदोलन

**खांदा कॉलनी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिसांच्या लाठीचार्जच्या निषेधार्थ पनवेल महानगरपालिकेतील विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात नगरसेवकांनी गळ्यात निषेधाचे फलक परिधान करून केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांवर करण्यात आलेली कारवाई अमानुष असून, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या अनोख्या आंदोलनाकडे नागरिकांचे लक्ष वेधले गेले असून, शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांबाबत शासनाने संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.



### सरिता वाघेंची उपसरपंचपदी निवड

**पाताळगंगा :** ग्रुप ग्रामपंचायत माजगाव उपसरपंचपदी महाविकास आघाडीच्या माध्यमातून सरिता कमलाकर वाघे यांची बिनविरोध निवड झाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे यांनी सरिता वाघे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेऊन, पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, स्थानिक नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर ग्रामविकासाला प्राधान्य देत सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते नरेश पाटील, रमेश जाधव, अमित पाटील, मथुरा वाघे, जयेश पाटील, संतोष महाब्दी, कमलाकर वाघे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### काँग्रेसचे पनवेलमध्ये आंदोलन

**खांदा कॉलनी :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट परिक्षा प्रकरणी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनादरम्यान झालेल्या पोलीस लाठीचार्जच्या आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतल्याच्या निषेधार्थ पनवेल शहर काँग्रेसच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुदाम पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिस कारवाईचा निषेध करत दोषींवर कारवाईची मागणी केली. यावेळी नगरसेवक हरीश केणी, लतीफ शेख व काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता यावी आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी केली. या आंदोलनात काँग्रेसचे शहराध्यक्ष, महिला काँग्रेसच्या पदाधिकारी, युवक काँग्रेसचे कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले. राहुल गांधी यांना ताब्यात घेण्याच्या कारवाईचा निषेध करत लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न अयोग्य असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र हुकूमशाहीपुढे झुकणार नाही : चित्रलेखा पाटील



डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून लाखो विद्यार्थ्यांनी दिवस - रात्र अभ्यास केला, पालकांनी कष्टाचे पैसे खर्च केले; पण कथित नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घालण्यात आला. एवढेच नाही, तर न्याय मागण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांना लाठीचा प्रसाद देण्यात आला. ही लोकशाही नव्हे, तर दडपशाही आहे, असा घणाघाती आरोप शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केला. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळ झाला असताना केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि गृहमंत्री अमित शाह यांनी सत्तेवर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली. शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित तरुणाईला लाठ्या दाखवून गप्प बसवता येणार नाही. हुकूमशाहीला महाराष्ट्र कधीही शरण जाणार नाही. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न रस्त्यावरच उत्तर देईल, असा इशाराही त्यांनी दिला. शेकापच्या संघर्षमय परंपरेचा उल्लेख करत त्या म्हणाल्या, पेझारी, चरी आणि रायगडची भूमी अन्यायाविरोधातील लढ्याची साक्षीदार आहे. स्व. नारायण नागू पाटील यांनी सावकारशाहीविरोधात उभा केलेला संघर्ष आजही आमच्यासाठी प्रेरणास्थान आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठीही शेकाप त्याच ताकदीने रस्त्यावर उतरेल. सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाचाही उल्लेख करत त्यांनी सरकारवर टीका केली. जागतिक स्तरावर गौरवलेल्या व्यक्तीच्या शांततामय आंदोलनाचीही दखल घेतली जात नाही; उलट पोलीस बळाचा वापर करून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न होतो. ही लोकशाहीची नव्हे, तर हुकूमशाहीची लक्षणे आहेत, असे सांगत त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला.



### तरुणांनो जागे व्हा, रात्र वैऱ्याची : ॲड. मानसी म्हात्रे

लडाख येथील आदिवासी समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या वांगचुक यांचे वारसदार सोनम वांगचुक एक थोर वैज्ञानिक, पर्यावरण शास्त्रज्ञ आहेत.



विद्यार्थ्यांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी दिल्लीमधील जंतरमंतरमध्ये उपोषण केले. नीट पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांच्या झालेल्या नुकसानीसाठी त्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन सुरु केले. मात्र, त्यांनाच हिनतेची वागणुक या सरकारने दिली आहे. त्यांचे आंदोलन दडपण्यासाठी हुकूमशाहीचा अवलंब करण्यात आला. केंद्रीय शिक्षण मंत्री यांचा राजीनामा मागण्यासाठी त्यांनी गेली वीस दिवस उपोषण केले. मात्र, या कालावधीत त्यांच्याकडे साधे कोणी फिरकलेही नाही. शिक्षणमंत्र्यांना का पाठीशी घातले जात आहे, असा संतप्त सवाल मानसी म्हात्रे यांनी केला. तसेच, काल-परवा झालेल्या आंदोलनात तरुणांसह तरुणींनीही







स्वयंस्फुर्तीने सहभाग घेतला होता. फक्त न्याय मिळावा, म्हणून त्यांनी संविधान मार्गाने लढा केला होता, काय दोष होता त्यांचा? असा संतापजनक सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रातील अलिबागच्या भूमीत दिल्लीचे तख्त राखण्याचे सामर्थ्य आहे. शेतकरी कामगार पक्ष कायम तरुणांच्या पाठीशी आहे. वेळप्रसंगी दिल्लीत जाऊन अलिबागची ताकद दाखविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा, असे म्हणत मानसी म्हात्रे यांनी रायगड जिल्हा परिषद शाळांची अवस्था, शैक्षणिक पद्धती, शिक्षकांकडे असेलेले अशैक्षणिक काम या मुद्द्यावर सवाल उपस्थित करीत तरुणांचे भवितव्य घडविण्यासाठी शिक्षण धोरण बदलण्याची गरज आहे. त्यासाठी एकजुटीने एकत्र या, असे आवाहनही त्यांनी केले.

### एकजूटीने लढा देण्याची गरज : नंदु तळकर

१९४७ पुर्वीचा भारत या ७५ वर्षानंतर देशामध्ये पहावयास मिळत आहे, ते विदारक चित्र आहे. १९४७ नंतर भारत जन्माला आला. स्वराज्याचे सुराज्य निर्माण व्हावे, अशी संकल्पना होती. परंतु, देश अराजकतेकडे चालला असल्याचे चित्र आहे. त्याला कुठेतरी बंधन आणणे गरजेचे आहे. त्यासाठी जागृत राहण्याची आवश्यकता आहे, हे आपले कर्तव्य आहे. मुलांच्या उच्च शिक्षणासाठी पालक पोटाला चिमटा काढून पैसे भरतात. मुले रात्रीचा दिवस करून अभ्यास करतात. मात्र, या पेपर फुटी प्रकरणानंतर शिक्षणाला आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला महत्त्व राहिले नाही, अशी परिस्थिती देशात सुरू आहे. हे भांडवलदारांचे सरकार आहे. त्यांना एकजुटीने विरोध करण्यासाठी प्रत्येकाने लढा दिला पाहिजे. दिल्ली येथील जंतर मंतर येथील तरुणांनी त्यांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन केले. केंद्रीय शिक्षण मंत्री यांचा राजीनामा मागितला जात आहे; मात्र, या मागणीकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. ही परिस्थिती भयानक आहे, त्यांना आंदोलनातून ताकदीनिशी सामोरे जावे लागणार आहे, असे साहित्यिक नंदू तळकर यांनी आवाहन केले.

### अन्यायाविरोधात पुन्हा लढा देऊ या : अनिल पाटील

आपल्या महाराष्ट्रातील कोकणातील एक मराठी तरुण दिल्लीत जाऊन असंख्य तरुणांना



एकत्र करतो. त्यांच्या न्याय हक्कासाठी लढतो, ही अभिमानाची गोष्ट आहे. त्याच्या आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी आणि लाठीहल्ल्याविरोधात निषेध व्यक्त करण्यासाठी अलिबागमध्ये बैठक आयोजित केली आहे.

तरुणांना न्याय मिळावा, म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी अलिबाग नव्हे, तर संपुर्ण रायगड जिल्ह्याचे नेतृत्व स्विकारले आहे. भावी, उद्योजक, अधिकारी, इंजिनिअर बनणाऱ्यांना बेचिराख केले जात आहे. ही गोष्ट गंभीर आहे. हे भाजपचे सरकार फक्त पक्षांतर करण्यामध्ये अधिक मग्न आहे. मात्र, येथील तरुणांच्या समस्यांकडे लक्ष देण्यास त्यांना वेळ नाही, ही चिंताजनक बाब आहे. सर्वसामान्यांसह विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडण्याचे काम सरकारने केले आहे. त्यामुळे तरुणांच्या आंदोलनात दिल्लीमध्ये सक्रीय सहभाग घेण्याची गरज आहे. चित्रलेखा पाटील तरुणांच्या न्याय हक्कासाठी मैदानात उतरल्या आहेत. त्यांचे हात मजबूत करण्यासाठी त्यांना साथ देण्यासाठी गरज आहे. उठा जागे व्हा, राष्ट्रध्वज घेऊन अन्यायाविरोधात पुन्हा लढा देऊ या असे आवाहन शेकापचे अनिल पाटील यांनी केले.

# उरण कचऱ्याच्या ढिगाऱ्यात



- बायोगॅस प्रकल्प तीन वर्षांपासून बंद
- नागरिक जीवघेण्या आजाराच्या संकटात

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा कारभार पूर्णपणे कोलमडला आहे. कोट्यवधी रुपयांचा ठेका मिळालेल्या मे. समिक्षा वेस्ट एंटरप्राईजेस इन्फ्रा प्रा. लि. या ठेकेदार कंपनीने करारातील अटी-शर्तींची उघडपणे पायमल्ली करूनही नगरपरिषद प्रशासनाने त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी मुदतवाढ देऊन अभय दिल्याचा गंभीर आरोप होत आहे. परिणामी उरण शहर कचऱ्याच्या विळख्यात सापडले असून, आता या अस्वच्छतेचे रूपांतर थेट डेंग्यूसारख्या जीवघेण्या आजाराच्या संकटात होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

करारानुसार घराघरातून ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे संकलित करणे, ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून बायोगॅस, वीज व सेंद्रिय खत निर्मिती करणे, गांडूळ खत व कंपोस्ट प्रकल्प राबविणे बंधनकारक होते. मात्र, प्रत्यक्षात या अटींची सर्रास पायमल्ली होत आहे. कोट्यवधी रुपयांचा ठेका केवळ कागदावरच राहिला असून, शहर मात्र कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली गुदमरू लागले आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, घनकचरा व्यवस्थापनाचा कणा मानला जाणारा बायोगॅस प्रकल्प तब्बल तीन वर्षांपासून बंद आहे. अत्याधुनिक यंत्रणा उभारूनही प्रकल्प सुरू न केल्याने ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया होत नसून सर्वत्र दुर्गंधी, घाणीचे साम्राज्य आणि डासांची उत्पत्ती वाढत आहे. त्याचा परिणाम आता थेट नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे चित्र समोर येत आहे. उरण नगरपारिषदेच्या अनेक कर्मचाऱ्यांना डेंग्यूची लागण झाल्याची माहिती समोर येत असून, शहरातील इतर नागरिकांमध्येही मोठ्या प्रमाणावर डेंग्यूचा फैलाव होत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे उरणमध्ये डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीतही स्वच्छता यंत्रणा प्रभावीपणे काम करत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातील अनेक भागांत घंटागाड्या वेळेवर येत नसल्याने नागरिकांना रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याशिवाय पर्याय राहत नाही. परिणामी सर्वत्र दुर्गंधी, डास, माशा आणि साथीच्या रोगांना आयते निमंत्रण मिळत आहे. नागरिक नियमित स्वच्छता कर भरत असतानाही बदल्यात त्यांना मिळते ती घाण, दुर्गंधी आणि निष्क्रिय प्रशासन. याहून गंभीर बाब म्हणजे, करारातील अटींचा भंग, बायोगॅस प्रकल्प बंद, निकृष्ट कामकाज, वाढता डेंग्यूचा धोका आणि नागरिकांच्या तक्रारींचा ढीग असतानाही संबंधित ठेकेदाराला मुदतवाढ देण्यात आली. त्यामुळे ''कुंपणच शेत खात आहे'', अशी संतप्त प्रतिक्रिया उरणभर उमटत आहे.

उरणकरांच्या जीवाशी सुरू असलेला हा निष्काळजीपणाचा खेळ तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करण्यात आली नाही, तर उरणमध्ये तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी उरण नगरपरिषद प्रशासन, संबंधित अधिकारी आणि ठेकेदार कंपनीवर राहील, असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे.

# रस्त्यांच्या समस्या घेऊन धडक

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी उपअभियंता डी.एम. पाटील यांची उरण पंचायत समिती सदस्य कविता पाटील, माजी सभापती विश्वास म्हात्रे, सरपंच भास्कर मोकल, रूपेश पाटील, रोहिदास पाटील, ॲड. पर्जन्य म्हात्रे, उपसरपंच गजानन गायकवाड, भार्गव पाटील आदी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आले. खोपटा कोप्रोली चिरनेर रस्त्यावरील खड्डे त्वरित भरणे, जुना खोपटा पुलाची दुरुस्ती



कामाला गती देऊन वाहतुकीस खुला करणे, तसेच या रस्त्याला आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसवणे, अशा मागण्या करण्यात आल्या. याशिवाय खोपटा कोप्रोली कलंबुसरे चिरनेर येथील पाण्याचा नीट निचरा न होणाऱ्या मोऱ्यांची दुरुस्ती करणे व काही ठिकाणी नवीन छोटे पूल (बॉक्स कलवर्ट) उभारणे इत्यादी मागणी केली. याबाबत नव नियुक्त उप कार्यकारी अभियंता डी.एम. पाटील यांनी तातडीने कार्यवाही करण्याबाबत विभागाला सूचना केल्या.

## वंचित बहुजन आघाडीचा संप

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

वंचित बहुजन आघाडी कर्जत तालुक्याच्यावतीने दि.२३ जुलै रोजी जाहीर करण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन, व्यापारी फेडरेशन तसेच विविध सामाजिक, व्यापारी व नागरिक संघटनांना सहकार्याची विनंती करणारी निवेदने देण्यात आली आहेत. निट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान दि. २० जुलै रोजी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज व अत्याचाराचा वंचित बहुजन आघाडीने निषेध व्यक्त केला आहे.

## ठाणेन्हावे पुलाची दुरुस्ती होईना

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील ठाणेन्हावे गावाच्या वेशीवर असणाऱ्या प्रवेशद्वाराजवळ असणारा पूल नदीच्या पाण्याच्या प्रवाहाने ५ जुलैच्या मुसळधार पावसात कोसळला. त्यामुळे या गावचा संपर्क तुटल्याने ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत लवकरात लवकर तात्पुरता तरी स्वरूपाचा पूल व्हावा, अशी मागणी केली.

परंतु, गेल्या पंधरा दिवसापासून संत गतीने काम सुरू असल्याने ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असून, ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत संताप व्यक्त केला आहे. तसेच, दि.२१ जुलै रोजी खालापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्रव्यवहार करत येत्या सोमवारपर्यंत या पुलाची दुरुस्ती न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून दिला आहे. यावेळी माजी उपसरपंच प्रवीण लाले, माजी उपसरपंच संदीप बोरले, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य संतोष खाडे, ग्रामस्थ ॲड. भगवान लाले, विश्वनाथ म्हशीलकर, लक्ष्मण म्हशीलकर, प्रवीण बोरले, हरेश बोरले, जयेश खाडे, अंकुश मते, पांडुरंग धारणे, रोहन बोरले आदी प्रमुखासह अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

**शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप | शिलार धरणासाठी ३,६७२ कोटींचा ऐतिहासिक प्रस्ताव**

# रायगडचा शेतकरी होणार मत्स्य उत्पादक

**। रायगड । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त उरण तालुक्यातील खोपटे येथील राजिप शाळेत आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील ५५० शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून मत्स्यपालनाला चालना देऊन शेतकऱ्यांना उत्पन्नाचा शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.





यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी, रायगड जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीसाठी मत्स्यपालन क्षेत्र अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण, वित्तीय सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, तहसीलदार उद्धव कदम, तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ, पंचायत समिती सदस्या कविता पाटील, तारपोवाला सागरी जीवशास्त्र केंद्राचे डॉ. भरत यादव व डॉ. रवींद्र बोंद्रे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना, जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, रायगडला १२२ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला असून, सागरी तसेच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाची मोठी क्षमता आहे. जिल्ह्याचा मोठा भूभाग डोंगराळ असल्याने पारंपरिक शेतीला मर्यादा आहेत. त्यामुळे मत्स्यपालन हा शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा प्रभावी आणि शाश्वत पर्याय ठरू शकतो. आगामी काळात लाभार्थी शेतकऱ्यांसाठी मत्स्यपालन तंत्रज्ञान, खाद्य व्यवस्थापन, रोगनियंत्रण, उत्पादन व्यवस्थापन, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि विपणन याविषयी तालुकानिहाय प्रशिक्षण आयोजित केले जाणार आहे. तसेच, शेततळे आणि बायोफ्लॉक तंत्रज्ञानालाही प्रोत्साहन दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई महानगर प्रदेश, जेएनपीटी आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे मत्स्य उत्पादनासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध असून, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातीच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीच्या मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात, असेही त्यांनी नमूद केले. सागरी मच्छीमारांना भांडवलाच्या अभावामुळे खासगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते, ही बाब चिंताजनक असल्याचे सांगत प्रमुख कोळीवाड्यांमध्ये बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. अलिबाग तालुक्यातील आक्षी येथे बँक ऑफ बडोदाची शाखा सुरू करण्यात आली असून, भविष्यात इतर कोळीवाड्यांमध्येही अशा सुविधा उपलब्ध करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

## गुटख्याचा बेकायदा साठा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या तंबाखूजन्य गुटखा व पानमसाल्याच्या बेकायदेशीर साठ्यावर म्हसळा पोलिसांनी धडक कारवाई करत कुंभारआळी परिसरातून २६ हजार १३६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी भोला उर्फ रामअवतार रामाधार धिमर (४६) याला अटक करण्यात आली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. म्हसळा पोलिसांकडून दि.२० जुलै रोजी रात्री साडेनाऊच्या सुमारास कुंभारआळी येथील एकशर शाईन कॉम्प्लेक्समधील भोला धिमर याच्या राहत्या घरावर छापा टाकण्यात आला.

# माझा देश जिवंत आहे

ये दीवार टूटती क्यूं नही है ही जाहिरात सर्वांना आठवत असेल. नरेंद्र मोदींची लोकप्रियता आणि हिंदुत्ववादी भाजपची ताकद ही त्या न तुटणाऱ्या भिंतीसारखी आहे असा एक समज प्रचलित झाला होता. भाजप सतत निवडणुका जिंकत होता. काँग्रेसवाले जिंकूनही राज्ये गमावत होते. उद्धव ठाकरेंची शिवसेना डोळ्यादेखत तोडली जात होती. तरीही जनता भाजपच्या बाजूने उभी राहत होती. त्यामुळे राजकीय वातावरणात एक प्रकारची निराशा आली होती. पण ही तथाकथित भिंत अजिबात अटूट वगैरे नाही हे सोमवारी सिध्द झालं. कॉकरोच जनता पार्टीच्या दिल्लीतील मोर्चामुळे भाजपच्या अभेद्यपणाचे सगळे दावे उद्ध्वस्त झाले. किंबहुना, ती भिंत पूर्वीच तुटून गेली आहे हे त्यातून दिसले. निवडणुकांमध्ये भलेही भाजपला यश मिळो, पण हा पक्ष इथल्या तरुणांच्या मनातून उतरलेला आहे हे त्या दिवशी स्पष्टपणे दिसलं. कोण्या एका कारणामुळे एखाद्या पक्षाबाबत नाराजी असली तरी तरुण असे लगेच रस्त्यावर येत नाहीत. त्यातून मोदी आणि अमित शाह यांचे पोलिस काय वाट्टेल ते करू शकतात ही भीती होती व अजूनही आहेच. पण ही भीती झुगारून देऊन भारतभरातले तरुण रस्त्यावर आले.आपला देश अजूनही जिवंत आहे हे आश्वासन त्या तरुणाईने दिले. महाराष्ट्र, बिहार, बंगालमध्ये मतदानामध्ये भानगडी झाल्या, निवडणूक निधीच्या नावाखाली पंतप्रधानपदाच्या नावाने भ्रष्टाचार झाला, जागोजागी पेपर फुटले, परीक्षा पुढे गेल्या. नोकऱ्या मिळेनाशा झाल्या. तरीही इथली जनता शांत होती. पण नीटच्या पेपरफुटीनंतर त्यांच्या आतल्या संतापाचा स्फोट झाला. परवाच्या मोर्चामध्ये बहुसंख्य तरुणांनी कॅमेऱ्यांसमोर मोदी राजवटीच्या विरोधात जहरी टीका केली. मोर्चामध्ये जब जब मोदी डरता है, हिंदू-मुस्लिम करता है अशा घोषणा खुलेआम देण्यात आल्या. भाडोत्री, दलाल टीव्ही वाहिन्यांच्या वार्ताहरांना हे १७-१८ वर्षांचे तरुण हाकलून देत होते. यावरूनच त्यांची राजकीय समज किती प्रगल्भ आहे हे कळावे. मोदींच्या भाजपची अंदरकी बात इथल्या तरुणांना केव्हाच कळलेली होती. दिल्लीत सोमवारी ती सर्वांसमोर प्रकट झाली.

## एक भेदक सत्य- विश्वास उडाला

कॉकरोच जनता पार्टी ही कालपरवा स्थापन झालेली संघटना आहे. अभिजित दीपके सोडले तर तिचे बाकीचे पदाधिकारी कोणालाही ठाऊक नाहीत. या मंडळींना धोरणे ठरवण्याचा, कार्यक्रम आखण्याचा कसलाही अनुभव नाही. परवाच्या मोर्चात हा विस्कळितपणा दिसला. चलो संसद असा नारा तिने दिला. पण पोलिसांनी नाकेबंदी केल्यानंतर पुढे काय करायचे हे कोणालाही ठाऊक नव्हते. दीपके यांनी आपल्या समोरच्या जमावाला शांततेने राहण्याच्या सूचना दिल्या. पण दिल्लीभर पसरलेल्या मुलांशी त्यांचा संपर्क नव्हता. इंटरनेट बंद असल्याने सर्वांचीच कोंडी झाली होती. भारतभरातून आलेल्या मुलांची एकमेकांशी ओळख नव्हती. मात्र अन्यायाला विरोध करण्याची भावना त्यांच्यात होती. तोच त्यांच्यातला एक समान धागा होता. आपण शांततेच्या मार्गानेच जायला पाहिजे हे त्यांना पटलेले होते. त्यामुळे पोलिसांनी इतकी बेदम मारहाण करून व लाठीमार वगैरेंचे अत्याचार होऊनही ही मुले शांत राहिली. त्यांनी कोठेही उलट हात उचलला नाही. अगदी किरकोळ घटना वगळता, कोठेही तोडफोड झाली नाही. अनेकदा अशा आंदोलनात गुंड घुसून ते हात साफ करून घेतात. पण इथे तसे घडू शकले नाही. अशा तोडफोडीचा एक जरी ठळक प्रसंग घडला असता तरी मोदी सरकार आणि त्यांचा भाडोत्री मिडिया यांना ओरडा करता आला असता. हे मोठे कारस्थान आहे वगैरे बोंब ठोकता आली असती. पण तसे घडू शकले नाही. आंदोलनासाठी जमलेल्या हजारो मुलांनी ते होऊ दिले नाही. कारण त्यांच्या प्रेरणा सच्च्या आहेत. त्यांना हा किंवा तो राजकीय पक्ष याहूनही आपल्यावरच्या अन्यायाबाबतचा आक्रोश महत्वाचा होता. तो त्यांनी केला. अमुक हजारोंची गर्दी जमली किंवा मोर्चा निघाला यापेक्षाही उस्फूर्तपणे आलेल्या या तरुणाईने शांतता बाळगली व मोदींवरचा अविश्वास आणि संताप व्यक्त केला हे सर्वात अधिक भेदक आहे. भाजप अजूनही काही वर्षे राज्ये करील. काही निवडणुकांमध्ये कदाचित विजयही मिळवेल. पण एका मोठ्या समुदायाचा या सरकारवरचा विश्वास उडाला आहे.

## विरोधकांची जबाबदारी

त्या दिवशी मोर्चामध्ये काही हजार मुले असतील. पण देशभर त्यांना पाठिंबा देणारे कोट्यवधी लोक आहेत. म्हणून तर सर्व राज्यांमध्ये आणि शहरांमध्ये या मोर्चाला पाठिंबा देणारी निदर्शने झाली व त्यातही लोक उस्फूर्तपणे सामील झाले. त्यासाठी कोठेही भाड्याने ट्रक आणावे लागले नाहीत किंवा वारंवार जाहिराती आणि आवाहने करावी लागली नाहीत. परवाच्या मोर्चापासून जंतरमंतरवर आंदोलकांना भेटण्यासाठी राजकीय मंडळींची जी लाईन लागली आहे तीच यांच्या यशाची पावती आहे. उद्धव ठाकरे यांनी वांगचुक यांच्या उपोषणापासूनच त्यांना पाठिंबा दिला होता. ते तेथे गेले. शरद पवार हे सहसा अशा ठिकाणी जात नाहीत. पण मंगळवारी ते गेले. बुधवारी जरांगे पाटील गेले. ममता बॅनर्जी यांनी आंदोलनात सहभागी होणार असल्याचे म्हटले आहे. अखिलेश यादव, केजरीवाल हेही नियमितपणे जात आहेत. एरवी स्वतः गर्दी जमवू शकणाऱ्या या नेत्यांनी दीपके आणि त्यांच्या आंदोलनाच्या यशाला दिलेली ही पावती आहे. काल राहुल गांधी यांनी पंतप्रधानाच्या घरासमोर धरणे आंदोलन केले. हीदेखील अप्रत्यक्ष पावतीच होती. या आंदोलनाला राहुल यांनी भेट दिलेली नाही. किंवा थेट निर्भेळ असा पाठिंबा दिलेला नाही. सोमवारी आंदोलकांवर झालेल्या लाठीहल्ल्याचा त्यांनी निषेध केला. पण आंदोलक तसेच वांगचुक यांच्याबाबत त्यांच्या मनात काही शंका आहेत हे स्पष्ट दिसते. वांगचुक आणि दीपके हे भाजपनेच उभे केलेले लोक आहेत असे अनेकांना वाटते. उद्या पुढेमागे हे लोक भाजप आणि मोदींना पाठिंबा देणारी भूमिका घेतील असे या टीकाकारांना वाटते. पण पुढे काय होईल अशी भीती व्यर्थ आहे. आज दीपके मोदींना हुकुमशहा म्हणत आहेत. वांगचुक स्पष्टपणे भाजपच्या मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करीत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे सोमवारी जमलेली मुले ही कोणत्याच राजकीय पक्षाची नव्हती. तरीही ती मोदी सरकारविरोधातील असंतोष व्यक्त करण्यासाठी रस्त्यावर उतरली. काँग्रेस किंवा कोण्याही विरोधकांना भाजपविरोधाचे राजकारण करायचे असेल तर या तरुणांना आपलेसे करायला हवे. ती भाजपच्या जाळ्यात सापडणार नाहीत हे पाहायला हवे. यासाठी राहुल यांनी आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून जंतरमंतरवर जाऊन आंदोलक मुले आणि नेते यांची भेट घ्यायला हवी. संसदेत वा इतरत्र या मुलांची स्पष्टपणे तारीफ करायला हवी. त्यांना त्यांचे श्रेय द्यायला हवे. आम आदमी पक्षाने काँग्रेसवर टीका टाळायला हवी. अन्यथा, तरुणांनी कमावले आणि ज्येष्ठांनी घालवले असे म्हणायची वेळ येईल.

**विचार**

# पुन्हा पुन्हा युद्धाचे ढग

***आर्थिक निर्बंध, अणुकार्यक्रमाबद्दलचा वाद, आखाती प्रदेशातील वर्चस्वाची स्पर्धा, इस्त्रायलचा सुरक्षाविषयक प्रश्न आणि महासत्तांमधील भू-राजकीय संघर्ष यामुळे अमेरिका-इराणमधील तणाव पूर्णपणे निवळलेलाच नाही. होर्मुज सामुद्रधुनीत व्यापारी जहाजांवरील हल्ले, त्यानंतर अमेरिकेचे हवाई हल्ले आणि इराणकडून आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर प्रत्युत्तरपर कारवाया यामुळे संघर्ष पुन्हा पेटला. हे सतत असेच होत राहणार?***




**आरिफ शेख**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष काही नवीन नाही. १९७९ च्या इराणी इस्लामिक क्रांतीनंतर या दोन देशांमधील संबंध सतत तणावपूर्ण राहिले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष केवळ सीमावाद किंवा दोन राष्ट्रांमधील वैर नाही, तर तो जागतिक अर्थकारण, ऊर्जा सुरक्षितता आणि महासत्तांच्या स्पर्धेचे केंद्र बनला आहे. या संघर्षाचा केंद्रबिंदू म्हणजे होर्मुजची सामुद्रधुनी. पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडणारा हा समुद्री मार्ग भौगोलिकदृष्ट्या अत्यंत अरुंद असला, तरी जागतिक अर्थव्यवस्थेसाठी त्याचे महत्त्व अमूल्य आहे. जगातील सुमारे पाचव्या भागाइतक्या कच्च्या तेलाची आणि मोठ्या प्रमाणावरील द्रवीकृत नैसर्गिक वायूची (एलएनजी) वाहतूक याच मार्गाने होते. सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती, कतार आणि इराण या तेल उत्पादक देशांचे बहुतांश निर्यात व्यापार या सामुद्रधुनीवर अवलंबून आहेत. त्यामुळे होर्मुजमधील कोणताही तणाव केवळ त्या प्रदेशापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद काही तासांमध्ये जगभरातील शेअर बाजार, तेलबाजार आणि चलनबाजारात उमटतात. याच कारणामुळे अमेरिका होर्मुजला आंतरराष्ट्रीय समुद्री मार्ग मानते. या मार्गावरील जहाजवाहतूक कोणत्याही अडथळ्याशिवाय सुरू राहावी, हा तिचा आग्रह आहे. दुसरीकडे, इराण या सामुद्रधुनीकडे आपल्या सामरिक शक्तीचे सर्वात प्रभावी साधन म्हणून पाहतो. आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव किंवा राजकीय दुभंगलेपण वाढल्यास होर्मुजमधील जहाजवाहतुकीवर प्रभाव टाकून अमेरिका आणि तिच्या मित्रदेशांवर दबाव आणता येतो, अशी इराणची धारणा आहे. त्यामुळे ही सामुद्रधुनी केवळ जलमार्ग राहिली नसून राजकीय सौदेबाजीचे अस्त्र बनली आहे.

अलिकडेच अमेरिकेने व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांनंतर इराणवर केलेली लष्करी कारवाई ही केवळ प्रतिशोधाची कृती नव्हती, त्यामागे दीर्घकालीन सामरिक संदेश दडला होता. जागतिक समुद्री व्यापाराला धोका निर्माण करणारी कोणतीही कृती अमेरिका सहन करणार नाही, हे दाखवून देणे हा त्याचा उद्देश होता. समुद्री मार्ग सुरक्षित ठेवणे हे अमेरिकेच्या जागतिक नेतृत्वाचे महत्त्वाचे प्रतीक मानले जाते. अमेरिकेने यावर कठोर प्रतिक्रिया दिली नसती, तर तिच्या मित्रदेशांच्या सुरक्षेवरील विश्वासाला तडा जाऊ शकला असता. इस्त्रायल, सौदी अरेबिया, बहरीन, कुवेत आणि संयुक्त अरब अमिराती यांसारखे देश अमेरिकेकडे सुरक्षा हमीदार म्हणून पाहतात. त्यामुळे इराणला प्रत्युत्तर देणे ही अमेरिकेची केवळ लष्करी नव्हे, तर राजनैतिक गरजही होती. यामागे दडलेला आणखी एक मोठा संदर्भ म्हणजे चीन आणि रशिया. गेल्या दशकात इराणने या दोन्ही देशांशी संरक्षण, ऊर्जा आणि व्यापारक्षेत्रात घनिष्ठ संबंध प्रस्थापित केले आहेत. चीनला ऊर्जा पुरवठा आणि 'बेल्ट अँड रोड' उपक्रमासाठी इराण महत्त्वाचा आहे, तर रशियासाठी पश्चिमी निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर इराण हा नैसर्गिक भागीदार ठरला आहे. त्यामुळे अमेरिकेच्या दृष्टीने इराणवर नियंत्रण ठेवणे म्हणजे केवळ एका प्रतिस्पर्धी देशाला रोखणे नव्हे, तर चीन-रशियाच्या वाढत्या प्रभावालाही मर्यादा घालणे आहे. इराणची राजकीय भूमिकाही गेल्या काही वर्षांमध्ये बदलली आहे.

पूर्वी प्रॉक्सी संघटनांच्या माध्यमातून संघर्ष छेडण्यावर भर देणारा इराण आता अधिक थेट आणि आक्रमक भूमिका घेताना दिसत आहे. आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर हल्ले करणे किंवा होर्मुजमधील जहाजवाहतुकीवर निर्बंध आणण्याची भूमिका हे त्याचेच द्योतक आहे. इराणला ठाऊक आहे, की पारंपरिक युद्धात अमेरिकेला पराभूत करणे शक्य नाही; मात्र संघर्षाची किंमत इतकी वाढवता येईल, की महासत्तांनाही युद्धाचा पुनर्विचार करावा लागेल. हीच त्याची 'कॉस्ट ऑफ कॉन्फ्लिक्ट' वाढवण्याची नीती आहे. या संघर्षाचे सर्वात मोठे परिणाम ऊर्जा बाजारावर दिसून येतात. होर्मुजमध्ये तणाव निर्माण झाला, की तेलाच्या किमती लगेच वाढतात. तेल महागले, की वाहतूक खर्च वाढतो, उद्योगांचे उत्पादन महागते, महागाई वाढते आणि जागतिक आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. भारतासारख्या देशांसाठी हा विषय अधिक संवेदनशील आहे. भारत आपल्या गरजेपैकी बहुतांश कच्चे तेल आयात करतो. त्यातील मोठा हिस्सा आखाती देशांकडून येतो. त्यामुळे होर्मुजमध्ये संकट निर्माण झाले, की भारताच्या आयात बिलावर, रुपयाच्या विनिमय दरावर आणि इंधनाच्या किमतींवर थेट परिणाम होतो. युद्धाचा परिणाम केवळ तेलापुरता मर्यादित राहत नाही. विमा प्रीमियम वाढतात, जहाज वाहतुकीचा खर्च वाढतो, माल पोहोचण्यास विलंब होतो आणि जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होते. कोरोना महामारीनंतर जागतिक अर्थव्यवस्था अजूनही पूर्णपणे स्थिर झालेली नाही. त्यात अशा संघर्षामुळे जागतिक व्यापारावर नव्याने दबाव निर्माण होऊ शकतो.

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अणुकार्यक्रम. इराणने अण्वस्त्र क्षमता प्राप्त करू नये असे अमेरिकेला वाटते, तर इराण आपल्या अणुकार्यक्रमाला सार्वभौम अधिकाराचा भाग मानतो. अनेक करार, निर्बंध आणि वाटाघाटी झाल्या; मात्र दोन्ही बाजूंमधील अविश्वास कधीच दूर झाला नाही. परिणामी, प्रत्येक करार तात्पुरता ठरला आणि प्रत्येक युद्धविराम अल्पजीवी ठरला. या परिस्थितीत इस्त्रायलचाही प्रभाव दुर्लक्षित करता येणार नाही. इराणच्या अणुकार्यक्रमाकडे इस्त्रायल अस्तित्वाच्या धोक्याच्या दृष्टीने पाहतो. त्यामुळे इराणविरोधातील अमेरिकेच्या धोरणावर इस्त्रायलचा प्रभाव असल्याचे अनेक विश्लेषक मानतात. दुसरीकडे, आखाती अरब देशांनाही इराणच्या वाढत्या प्रभावाची चिंता आहे. त्यामुळे पश्चिम आशियातील संघर्ष हा अनेक स्तरांवर चालणारा बहुआयामी संघर्ष बनला आहे. प्रश्न असा आहे, की या संघर्षाचा शेवट कुठे आहे? पूर्ण युद्ध कोणाच्याच हिताचे नाही. अमेरिका दीर्घकालीन युद्धात अडकू इच्छित नाही. इराणची अर्थव्यवस्था आधीच निर्बंधांमुळे दबावाखाली आहे. आखाती देशांना अस्थिरता नको आहे. चीन आणि रशियालाही सुरक्षित ऊर्जापुरवठा हवा आहे. त्यामुळे सर्व पक्षांना शेवटी चर्चेच्या टेबलावर यावे लागेल. मात्र विश्वासाचा पूर्ण अभाव असल्याने या वाटाघाटी अत्यंत नाजूक ठरणार आहेत. युद्धविराम हा शाश्वत शांततेचा पर्याय नसतो. तो संघर्षाला केवळ थोडा विराम देतो.

या पार्श्वभूमीवर इराणच्या सुरक्षाविषयक चिंता, अमेरिकेच्या अणुकार्यक्रमावरील आक्षेप, इस्त्रायलची सुरक्षा, आखाती देशांचे हित आणि जागतिक ऊर्जा पुरवठ्याची हमी या सर्व प्रश्नांवर समांतर तोडगा निघत नाही, तोपर्यंत पश्चिम आशियामध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होणे कठीण आहे. भारतातील धोरणकर्त्यांसाठीही हा संघर्ष महत्त्वाचा धडा आहे. ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण, सामरिक तेलसाठ्याची क्षमता वाढवणे, अक्षय ऊर्जेवरील गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय राजनैतिक संतुलन यांना अधिक महत्त्व देण्याची ही वेळ आहे. पश्चिम आशियातील प्रत्येक संकट भारतासाठी आर्थिक आव्हान ठरते. त्यामुळे दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेचा आराखडा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. होर्मुज सामुद्रधुनीवरील संघर्ष हा प्रत्यक्षात जागतिक व्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपाचे प्रतीक आहे. महासत्तांमधील स्पर्धा, ऊर्जा राजकारण, प्रादेशिक संघर्ष आणि आर्थिक हितसंबंध यांचे गुंतागुंतीचे जाळे या एका समुद्री मार्गाभोवती विणले गेले आहे. म्हणूनच या संघर्षाकडे केवळ अमेरिका-इराण युद्ध म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा संघर्ष जागतिक स्थैर्य, ऊर्जा सुरक्षितता आणि आर्थिक व्यवस्थेच्या भविष्याशी निगडित आहे. आज आवश्यक आहे ती संयम आणि संवादाची भूमिका. शक्तिप्रदर्शनातून तात्पुरते वर्चस्व मिळू शकते; परंतु स्थैर्य केवळ विश्वास आणि संवादातूनच निर्माण होते. अमेरिका आणि इराण यांनी संघर्षाऐवजी संवादाला प्राधान्य दिले, तरच पश्चिम आशियातील अस्थिरतेला आळा बसेल. अन्यथा, होर्मुज सामुद्रधुनीवरील प्रत्येक तणाव जगाच्या अर्थव्यवस्थेवर टांगती तलवार बनून राहील आणि त्याची किंमत संपूर्ण जगाला चुकवावी लागेल.

**चर्चा आजची**

# जालियनवाला बागची पुनरावृत्ती?

दिल्ली येथील जंतर मंतरवर सोनम वांगचुक हे उपोषणाला बसले होते. मात्र, त्यांना पोलिसांच्या फौजफाट्याने बळजबरिने उचलून अज्ञात ठिकाणी नेले. त्यानंतर त्यांचा लढा कॉक्रोज जनता पार्टीचे अभिजित दिपके यांनी पुढे चालूच ठेवला. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील पेपरफुटीच्या घटनांविरोधात कठोर कारवाई करावी, तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांची सुटका करावी, या मुख्य मागण्या सरकार समोर ठेवल्या होत्या. तसेच, या मागण्यांसाठी कॉकरोच जनता पार्टी अन् अभिजित दिपके यांनी सोमवारी (दि.२०) शांततापूर्वक संसद भवनावर मोर्चा काढण्याचे आणि त्यात देशभरातील तरूणांना त्यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्याप्रमाणे रविवारपासूनच जंतर मंतर वर हजारो अंदोलक जमले. त्यानंतर सोमवारी सकाळी सर्व हे आंदोलक शांततापूर्वक संसद भवनाकडे चालू लागले. परंतु, या पुढे जी घटना घडली ती जालियनवाला बाग हत्याकांडाची पुनरावृत्तीचं असल्याचे संपूर्ण देशातील आणि परराष्ट्रात राहणाऱ्या नागरिकांमधून बोलले जात आहे.

कॉकरोच जनता पार्टीच्या आवाहनानंतर दिल्लीसह महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कोल्हापूर, यवतमाळ तसेच लडाखमधील लेह आणि कारगिल येथेही विद्यार्थी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. यावेळी नीटच्या प्रवेश परीक्षा पेपरफुटीमुळे देशातील तरुणाई एकत्र झाली. तसेच, बहुतांश वेळ ऑनलाईन असणाऱ्या तरुणांना ऑनलाईन तयार झालेली कॉक्रोच जनता पार्टी आपली वाटली आणि त्यांनी देखील महिनाभरापासून दिल्लीतील जंतरमंतर येथे मुक्काम ठोकला. विशेष म्हणेज'' , आताची तरुणाई कुठेही मिनिटभर बुड टेकवत नाही, अशी ख्याती असताना महिनाभर त्यांनी ठोकलेल्या मुक्कामाकडे सगळा देश अप्रुपाने पाहू लागला. या आंदोलनात तरुणांच्या दोनच मागण्या होत्या, नीट परीक्षेतील घोटाळ्याची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा घ्या, आत्महत्या केलेल्या नीट परीक्षार्थींच्या कुटुंबाला एक कोटींची भरपाई द्या आणि सोनम वांगचूक यांची सुटका करा. एकूण काय तर सरकारने पारदर्शक परीक्षांची जबाबदारी घ्यावी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा खेळखंडोबा थांबवावा, अशी साधी अपेक्षा होती. त्यासाठी सोमवारी कॉक्रोज जनता पार्टीच्या आवाहनानंतर जंतर मंतर ते संसद भवन असा शांततेत मोर्चा काढण्यात आला. यादरम्यान संबंधित मंत्री खासकरून स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी या आंदोलकांची भेट घेऊन सकारात्मक चर्चा करतील, अशी सर्वांची अपेक्षा होती. परंतु, घडले भलतेच. यावेळी पोलिसांनी सरळ सरळ हे आंदोलन बेकायदेशीर असल्याचे सांगत परिसर रिकामा करण्याचे आदेश दिले. मात्र, आंदोलकांनी संसदेकडे कूच करण्याचा निर्धार कायम ठेवला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी संसद मार्गावरील लोखंडी बॅरिकेड्स हटवण्याचा प्रयत्न केल्याने पोलीस आणि आंदोलक आमनेसामने आले. संसदेपासून अवघ्या काहीशे मीटर अंतरावर दोन्ही बाजूंमध्ये मोठा संघर्ष झाला. यावेळी पोलिसांनी लाठीमार आणि अश्रुधुराचा वापर केला. अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा करण्यात आला असून, काहींच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचेही सांगण्यात आले आहे. आंदोलनकर्त्यांनी बॅरिकेड्सना स्पर्श केल्यानंतर करंट बसल्याचा आरोपही केला आहे. मात्र, या आरोपांवर पोलिसांकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. गेल्या १०-१२ वर्षांत देशात कोणतीही हालचाल नाही, अशा काळात या तरुणांनी सर्वांमध्येच नवचेतना निर्माण केल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. मात्र, राजधानीतील पोलीस, आरएएफ, विविध फोर्सेसने या तरुणांचे कंबरडंच मोडण्याचा आटोकाट प्रयत्न केला.




**वैभव पाटील**

यावेळी दिल्ली पोलिसांनी संपूर्ण बळ वापरून आंदोलन चिरडण्याची पूर्ण तयारी केली होती. जंतर मंतरवर आलेले बहुतेक तरुण हे आयुष्यात प्रथमच एखाद्या आंदोलनात सहभागी झाले होते. कदाचित त्यांच्या कुटुंबातूनही रस्त्यावर उतरणारी ही पहिलीच पिढी असेल. या जेन झीला त्यांच्या घरच्यांनीही कधी पाच बोटे लावली नसतील, परंतु या तरूणांना स्वतःच्या भवितव्यासाठी पोलिसांचा लाठीमार सहन करावा लागला. नुसताच लाठीमार नाही, तर अमानुष हल्ला, अश्रुधुरांच्या नळकांड्या देखील फोडण्यात आल्या. यादरम्यान, अनेक तरूणांसह तरूणींच्या वरही मोठ्या प्रमाणात लाठीमार करण्यात आला. अनेक जण या आंदोलनात जखमी झाले. अनेकांची धरपकड करण्यात आली. त्यामुळे जंतरमंतरवरची परिस्थिती हाताबाहेर गेली. अनेकांच्या संपुर्ण शरिरावर काठ्यांचे वळ उठले, तर काहींची डोकी फुटली, काही जणं बेशुद्ध पडले. त्यानंतर हे आंदोलन रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी देखील सुरूचं होतं. यासर्व प्रकारामुळे पुन्हा एकदा जालियनवाला बाग हत्याकांडाची पुनरावृत्ती झाल्याचे सर्व देशभरातून बोलले जात आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''नीट परीक्षा पे चर्चा'' करावी एवढीच या विद्यार्थ्यांची अपेक्षा होती. मात्र, त्यांनी आणि त्यांच्या मंत्र्यांनी वडिलधाऱ्यांच्या भूमिकेतून सहानुभूतीपूर्वक ऐकून घेणे गरजेचे असताना त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. त्याचा साधा निषेध देखील पंतप्रधानांनी करू नये याहून लाजिरवाणे या देशासाठी काय असणार? याची चर्चा फक्त देशातच नाही, तर देशाबाहेर देखील होत आहे. याचे पडसाद आजही देशभरातील कानाकोपऱ्यात उमटत आहेत. याविषयी सरकारने लवकरच तरूणांशी सकारात्मक चर्चा केली नाही, तर एकदिवस विद्यमान सरकारचं जालियनवाला बागेत अडकेल, असे बोलले जात आहे.

**लोकसंसद**

## वेळीच संवाद झाला असता तर...



नीट पेपरफुटीप्रकरणी अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'पेपरफुटी हे घोर पाप' असल्याचे म्हटले आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे आश्वासन दिले. ही भूमिका स्वागतार्ह असली तरी ती थोडी उशिरा आल्याची भावना अनेकांच्या मनात आहे. गेल्या सुमारे वीस दिवसांपासून जंतरमंतरवर विद्यार्थी शांततापूर्ण आंदोलन करत होते. तेव्हा सरकारकडून असा स्पष्ट संदेश गेला असता, तर विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ झाला असता. मात्र, दिल्ली पोलिसांच्या लाठीमार आणि अश्रुधुराच्या कारवाईनंतर देशभरात संतापाची लाट उसळली आणि त्यानंतरच पंतप्रधानांची प्रतिक्रिया समोर आली. त्यामुळे सरकारने सुरुवातीलाच संवाद साधून विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेतल्या असत्या, तर हा वाद इतका चिघळला नसता, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न हा राजकारणाचा नव्हे, तर देशाच्या विश्वासार्ह परीक्षा व्यवस्थेचा आणि तरुणांच्या भवितव्याचा आहे.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी**

**दिनविशेष**

# थोर भारतीय स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य टिळक



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य नेते, भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार आणि प्राच्यविद्या पंडित होते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच, या गर्जनेने त्यांनी लोकांमध्ये स्वातंत्र्यप्रेम जागवले. ते संपादक, शिक्षक आणि समाजसुधारक होते. त्यांचे धैर्य, देशभक्ती आणि राष्ट्रवादामुळे ते भारतातील लोकप्रिय नेते बनले.

त्यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली गावात झाला. त्यांचे जन्मनाव केशव, परंतु बाळ हेच नाव पुढे रूढ झाले. ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे पहिले जहालवादी नेते होते. त्यांचे वडील गंगाधर टिळक हे शाळेत शिक्षक होते. टिळकांनी १८७७ मध्ये पुण्यातील डेक्कन कॉलेजमधून बी.ए. गणित विषयात पदवी मिळवली. त्यानंतर १८७९ मध्ये मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातून त्यांनी कायद्याची पदवी घेतली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा टिळकांवर खूप प्रभाव होता. त्यांच्या प्रेरणेने टिळकांनी १८८० मध्ये शाळेची स्थापना केली. पुढे जाऊन टिळक आणि त्यांच्या काही निकटवर्तीयांनी १८८४ मध्ये डेक्कन सोसायटीची स्थापना केली.

अगदी सुरुवातीपासूनच टिळक भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग बनले. ब्रिटिश लेखक आणि राजकारणी, 'व्हॅलेंटाईन चिरोल' यांनी त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटले होते. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक आणि आगरकर यांनी १८८१ मध्ये आर्यभूषण छापखाना काढला आणि केसरी (मराठी) आणि मराठा ही दोन वृत्तपत्रे सुरू केली.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच समाजात एकोपा निर्माण व्हावा, यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची प्रथा सुरु केली. त्यानुसार १८९४ साली विंचूरकर वाड्यात गणेशोत्सवाची सुरुवात केली. वर्णव्यवस्था, वेदोक्त प्रकरण आदी धार्मिक बाबींशी संबंध येणाऱ्या गोष्टींवर जे वाद झाले, त्यांसंबंधी टिळकांची भूमिका ही त्यांच्या धर्मविषयक श्रद्धेतून घडविली गेली होती, असे दिसते. टिळकांना राष्ट्राइतकाच हिंदू धर्माचाही जाज्वल्य अभिमान होता. धर्म हा त्यांच्या व्यासंगाचा विषय होता. त्यांनी वेद, उपनिषदे, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्रे, गीता आणि आचार्यांची भाष्ये यांचा अभ्यास केला होता. ते जहालवादी क्रांतिकारकांना पाठिंबा देण्याच्या बाजूने होते आणि त्यांच्या 'केसरी' या वृत्तपत्रातून त्यांच्या कार्याचे खुलेपणाने कौतुक करायचे. केसरी या वृत्तपत्राद्वारे प्रफुल्ल चाकी आणि खुदीराम बोस यांना पाठिंबा दिल्याबद्दल त्यांना बर्माच्या मंडाले तुरुंगात सहा वर्षांची शिक्षा झाली.

चाकी आणि बोस या दोघांवर दोन इंग्रज महिलांच्या हत्येचा आरोप होता. टिळकांनी १९०८-१४ पासून मंडाले तुरुंगात सहा वर्षे घालवली. तिथे त्यांनी 'गीता रहस्य' लिहिले. या पुस्तकाच्या अनेक प्रती विकून जमा झालेला पैसा स्वातंत्र्य चळवळीला मदत करण्यासाठी दान करण्यात आला. १८८१ ते १९२० या चाळीस वर्षांच्या काळात टिळकांनी ५१३ अग्रलेख लिहिले. सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय, उजाडले पण सूर्य कुठे आहे, टिळक सुटले पुढे काय, प्रिन्सिपॉल, शिशुपाल की पशुपाल, टोणग्याचे आचळ, हे आमचे गुरूच नव्हेत, बादशहाब्राह्मण झाले हे त्यांचे काही प्रसिद्ध अग्रलेख आहेत. लोकमान्य टिळकांचे १ ऑगस्ट १९२० रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२३ जुलै
१) श्री.हरिश्चंद्र परशुराम बना कोळीवाडा,अलिबाग, दि.२३-७-१९५२
२)श्री.सुहास सिमाराम पाटील मु.वरसोली, अलिबाग दि.२३-७-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**पंकज दत्तात्रेय कोळी, वाढदिवस स्मृतीदिन, अलिबाग**

**श्री. राकेश महेंद्र मेहता, अहमदाबाद**

# आराठी ग्रामपंचायतीचा घनकचरा खेर्डी गावात

## प्रशासनाच्या नोटीसला शेतमालकांकडून केराची टोपली



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्यातील आराठी ग्रामपंचायतीचा घनकचरा भोस्ते ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील खेर्डी गावात बेकायदेशीरपणे टाकला जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. खेर्डी येथील जमीनमालक बदर शहा यांच्या खासगी शेतजमिनीत हा कचरा सातत्याने टाकला जात आहे. ग्रामपंचायतीच्या सूचना व नोटिस नंतरही जमीन मालकाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्याने या उघड्यावरील कचऱ्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. अत्यंत गंभीर बाब म्हणजे, या कचऱ्यातून वाहणारे दूषित पाणी आजुबाजूच्या शेतात त्याचप्रमाणे लगतच असलेल्या सार्वजनिक विहिरी जवळून जात आहे. त्यामुळे विहिरीत दूषित पाणी जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाळी दिवसात आरोग्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनण्याची शक्यता असून या परिसरात साथीचे रोग पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.

या प्रकाराबाबत खेर्डी येथील ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, भोस्ते ग्रुप ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत. भोस्ते ग्रामपंचायतीने या जागेचा पंचनामा केला असून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि कचरा तात्काळ हटवण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास खेर्डी गावात रोगराई पसरण्याची भिती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### रोगराई पसरण्याची शक्यता

बदर शाह यांनी खेर्डी येथे त्याच्या शेतात आराठी येथील घनकचरा आणून ठेवला आहे. शेतीच्या खालच्या बाजूस आमच्या गावाची सार्वजनिक जलजीवन अंतर्गत असलेली विहीर आहे. त्या विहिरी जवळून कचर्याचे पाणी जात आहे. २९ जून रोजी ग्रामस्थांनी ग्रुप ग्रामपंचायत भोस्ते येथे पत्रव्यवहार केला. पंचनामा करून ग्रामपंचायतने शाह यांना नोटीस दिली. मात्र तरीही त्यांनी कचरा उचलला नाही. १० जुलै रोजी ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना पत्र दिले. अद्यापही कचरा उचललेला नाही. त्यामुळे घनकचऱ्याचे पाणी विहिरीच्या गेल्यास गावात रोगराई पसरण्याची शक्यता असल्याचे खेर्डी गावातील गामस्थ प्रवीण प्रकाश मोहिते यांनी सांगितले.

## श्रीवर्धनमध्ये भ्रमणध्वनी सेवा विस्कळीत

**● प्रशासनाचे आपत्कालीन संदेश वेळेवर मिळेनात**

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात आगामी काही तासांत मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तवत मंत्रालयाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देणारे आपत्कालीन संदेश पाठवले जात आहेत. मात्र, दुसरीकडे श्रीवर्धन तालुक्यातील अनेक ठिकाणी गेल्या वीस दिवसांपासून भ्रमणध्वनी नेटवर्कची सेवा विस्कळीत झाल्याने हे महत्त्वाचे संदेश नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचतच नसल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.



स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीवर्धन तालुक्यात वारंवार नेटवर्क गायब होत आहे. नामांकीत भ्रमणध्वनी सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वारंवार तक्रारी करूनही यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. 'प्रशासनाकडून सुरक्षेच्या सूचना तर येत आहेत, पण भ्रमणध्वनीला नेटवर्कच नसल्यामुळे वेळेवर संपर्क साधणे अशक्य झाले आहे. गेल्या वीस दिवसांपासून आम्ही या समस्येचा सामना करत आहोत,' अशी संतप्त प्रतिक्रिया एका त्रस्त नागरिकाने व्यक्त केली.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीची शक्यता असताना भ्रमणध्वनी सेवा ठप्प राहणे नागरिकांच्या जीवितासाठी धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे संबंधित दूरसंचार कंपन्यांनी तात्काळ ही तांत्रिक अडचण दूर करावी आणि प्रशासनाने देखील या गंभीर बाबीकडे त्वरित लक्ष देऊन सेवा सुरळीत करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली जात आहे.



## रेशनिंग विभागाचा सर्व्हर वारंवार बंद

**●अपुऱ्या सोयीसुविधांमुळे नागरिकांची गैरसोय**

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल तहसीलदार कार्यालयातील रेशनिंग व पुरवठा विभागात इंटरनेट सर्व्हर वारंवार बंद पडत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मंगळवार आणि गुरुवारी रेशनिंगची विविध कामे होत असल्याने कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी उसळते.

रेशन कार्डावरील नाव कमी करणे, नवीन नाव समाविष्ट करणे, नवीन रेशन कार्ड काढणे, शिधापत्रिकेतील दुरुस्ती आदी सर्व प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन झाल्या आहेत. मात्र इंटरनेट सर्व्हर वारंवार डाऊन होत असल्याने कामकाज दोन ते तीन तास ठप्प होते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांगांना ताटकळत उभे राहावे लागते.

कार्यालयाबाहेर नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था अपुरी असून, उन्हाळा किंवा दमट वातावरणात पुरेशा पंख्यांचीही सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय अधिकच वाढत आहे. अनेकदा रांगेत तासन्‌तास उभे राहूनही काम न झाल्याने नागरिकांना पुन्हा दुसऱ्या दिवशी यावे लागते. मंगळवारी कधी कधी वीज वितरण मेंटेन्स करता शट डाउन घेते.

एकीकडे अत्याधुनिक नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाला असून डिजिटल युगात विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. मात्र, दुसरीकडे पनवेल तहसीलदार कार्यालयातील रेशनिंग विभागाचा इंटरनेट सर्व्हर वारंवार बंद पडत असल्याने प्रशासनाच्या डिजिटल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

'विमानतळ सुरू झाला, पण रेशनिंग विभागाचा सर्व्हर जोरात कधी चालणार?' असा संतप्त सवाल ज्येष्ठ नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांनी रेशनिंग विभागात उच्च क्षमतेची इंटरनेट सेवा, सक्षम सर्व्हर, पुरेशी बसण्याची व्यवस्था, पंखे आणि नागरिकाभिमुख सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## मनस्वी ग्रुपतर्फे शैक्षणिक मार्गदर्शन

**कर्जत :** मनस्वी ग्रुपचे संस्थापक विजय झिमुर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील मांडवणे येथील जिल्हापरिषद शाळेत शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजय झिमूर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आपण यशस्वी होऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे महत्वाचे आहेच, परंतु एक माणूस होणे फार गरजेचे आहे. त्यासाठी अभ्यासासोबत धार्मिकता सुध्दा जोपासली पाहीजे. तरच यशाचा खरा आनंद दुसऱ्याला देता येतो व आपल्याला सुध्दा घेता येतो.

## आदिवासी विद्यार्थ्यांना छत्री वाटप

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूरमधील चिंचवळी गोहे येथील राजिप शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना जयसिंघ अलॉय स्टील कंपनीच्या वतीने छत्र्यांचे वाटप करण्यात आले. चिंचवळी गोहे येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांचे वास्तव्य दुर्गम आदिवासी वाड्यांमध्ये आहे. शाळेपासून त्यांच्या वाड्यांचे अंतर अधिक असल्याने पावसाळ्यात छत्रीअभावी विद्यार्थ्यांना भिजतच शाळेत यावे लागत होते. ओल्या कपड्यांमध्ये दिवसभर शिक्षण घ्यावे लागत असल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब शाळेतील शिक्षकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी जयसिंघ अलॉय स्टील कंपनीकडे विद्यार्थ्यांसाठी तसेच अंगणवाडीतील बालकांसाठी छत्र्यांची मागणी केली. कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत या मागणीला तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत छत्री वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी कंपनीचे व्यवस्थापक संजय प्रसाद यांनी सांगितले की, आजचे विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीत येणाऱ्या सर्व अडचणी दूर करणे शक्य नसले, तरी आपल्या परीने मदतीचा हात दिल्यास त्यांचे भविष्य घडविण्यात आपण निश्चितच योगदान देऊ शकतो.

## अमोल पेणकर यांची फेरनियुक्ती

**रोहा :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संघटनात्मक पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मध्य रायगड जिल्हा सचिवपदी अमोल पेणकर यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. मुंबईतील शिवतीर्थ येथे आयोजित कार्यक्रमात राज ठाकरे यांच्या हस्ते पेणकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या नियुक्तीनंतर मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अमोल पेणकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## जिजाऊ संस्थेकडून शैक्षणिक साहित्य वाटप

**खांब :** जिजाऊ सामाजिक व शैक्षणिक संस्था महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने कोलाड विभागातील विविध शाळांमधून शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. जिजाऊ संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, शिक्षण महर्षी निलेश सांबरे यांच्या माध्यमातून संस्थेच्या वतीने कोलाड विभागातील श्री. रा.ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब, श्रमिक विद्यालय चिल्हे, एमपीएसएस इंग्लिश मेडिअम स्कूल कोलाड, प्रा.शाळा आंबेवाडी व केंद्र शाळा कोलाड येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी जिजाऊ संस्थेचे जिजाऊ रा.जि. प्रमुख वैभव म्हसणे, सदस्य नितीन शेलार, विशाल पवार, रूग्णवाहिका सेवक नितेश भोसले, ॲड.रविंद्र फर्डे, मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे

**पनवेल ग्रामीण :** रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कळंबोली वाहतूक विभागाच्या वतीने कामोठे येथील एम.एन. आर. स्कूलमध्ये विशेष वाहतूक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, वाहतूक सिग्नलचे पालन, झेब्रा क्रॉसिंगचा वापर तसेच दुचाकीवर हेल्मेट आणि चारचाकीमध्ये सीटबेल्ट वापरण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

## 'डॉक्टर आपल्या दारी' उपक्रम यशस्वी

**श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन संस्थेचा पुढाकार**

| पोलादपूर | प्रतिनिधी |

सध्या पावसामुळे आणि साधन नसल्यामुळे वयस्कर ग्रामीण भागातील जनतेला तालुक्याच्या ठिकाणी दवाखान्यात जाता येत नाही. त्यांचा आजार वाढू नये, यासाठी श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन संस्थेने गावोगावी जाऊन औषधे व डॉक्टरांची सोय करून त्यांची मोफत तपासणी करून आवश्यक औषधे देण्याचे काम सुरू केले आहे. या उपक्रमाला ग्रामीण जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

पोलादपूर तालुक्यात श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन ही संस्था गेल्या आठ ते दहा वर्षांपासून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम राबवत आहे. यंदापासून श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशन संस्थेने पावसाळ्यात गावोगावी जाऊन डॉक्टर आपल्या दारी उपक्रम चालू करीत हा दरवर्षी चालू राबविण्याचा मानस व्यक्त केला आहे.

यावर्षी श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशनतर्फे भोगाव, कोंढवी, देवपूर, ओबळी, पैठण, चरई, वडाचा कोंड व इतर ठिकाणी जाऊन मोफत आरोग्य तपासणी शिबीर राबविण्यात आले. श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशनचे आधारस्तंभ किसनदादा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिरांचे आयोजन करण्यात आले. डॉ. दिव्या सोनवणे, डॉ. गुलाबराव सोनवणे व आशा सेविका स्मिता चिकणे यांचे मोलाचे सहकार्य झाले. श्रीकाळभैरवनाथ फाउंडेशनचे संस्थापक विकास शिंदे, अजय कदम, सचिव रवींद्र मोरे, खजिनदार रामदास सुर्वे, विठ्ठल कदम, पोलादपूर तालुका अध्यक्ष हरिश्चंद्र जाधव, श्रीकाळभैरवनाथ रेस्क्यू अध्यक्ष दीपक उतेकर, वैभव जाधव आदी उपस्थित होते.

**बालकांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर** | **मंत्री आदिती तटकरे यांची घोषणा**

# 'बालस्नेही ग्रामपंचायत', 'बालस्नेही प्रभाग' उपक्रम राबविणार

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील प्रत्येक बालकापर्यंत आरोग्य, शिक्षण, पोषण आणि सामाजिक सुरक्षेच्या योजना प्रभावीपणे पोहोचाव्यात, तसेच बालकांमध्ये त्यांच्या हक्क व अधिकारांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने राज्यात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. अशी घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केली.

राज्य बाल हक्क आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. मंत्रालयात झालेल्या बैठकीत बालकांच्या मानसिक आरोग्य, मूल्यसंस्कार आणि जीवनकौशल्य विकासासाठी तयार करण्यात आलेल्या 'मानस' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पालघर जिल्ह्यातील ५० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या 'मानस' प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मानसिक आरोग्य कीटचे उद्घाटनही मंत्री तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी मंत्री तटकरे म्हणाल्या की, ५ सप्टेंबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत ग्रामीण व शहरी भागात विशेष अभियानाच्या स्वरूपात 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा मानस आहे. या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्क, अधिकार आणि संरक्षणाच्या यंत्रणांची माहिती देत त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली जाणार आहे.

यामध्ये गंभीर कुपोषण निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, एकात्मिक बाल संरक्षण योजना, पोषण, शिक्षण आणि बालसुरक्षा या विषयांवर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून प्रभावी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

आदिवासी भागातील सुमारे ५०० शासकीय आणि ५०० खासगी आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या जवळपास पाच लाख विद्यार्थ्यांसाठी बालस्नेही ग्रामपंचायत राबविताना प्रमाणित कार्यपद्धती निश्चित करावी. तसेच दुर्गम आणि आदिवासी भागातील बालकांच्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र उपक्रम आखण्याचा विचार करावा, असे निर्देश त्यांनी दिले.

शहरी भागात बालस्नेही प्रभाग राबविताना नगरविकास विभागाशी समन्वय साधून लोकसंख्येच्या तुलनेत अंगणवाड्यांची संख्या अपुरी असल्यास नवीन बालवाडी केंद्रे सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच बालपंचायतींच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार, बालहक्क, '१०९८' चाईल्ड हेल्पलाईन आणि विविध संरक्षण यंत्रणांची माहिती प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून बालकांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

> **राज्यात ० ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन विविध सकारात्मक उपाययोजना राबवित आहे. 'बालस्नेही ग्रामपंचायत' आणि 'बालस्नेही प्रभाग' हे उपक्रम बालकांच्या सुरक्षित, सुदृढ आणि सक्षम भविष्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरतील.**
> **– मंत्री आदिती तटकरे**

## निवडक



### विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी

**पाली/बेणसे :** रा.जि.प शाळा दहिगावचे माजी विद्यार्थी, ग्रुप ग्रामपंचायत दहिगावचे सदस्य तथा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य रवींद्र रामचंद्र शिंदे यांनी आपला वाढदिवस अत्यंत अनोख्या पद्धतीने साजरा केला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मी चॅरिटेबल आय ट्रस्ट शाखा पाली यांच्या सहकार्याने दहिगाव शाळेतील ७७ विद्यार्थ्यांची मोफत डोळे तपासणी करण्यात आली. आजच्या डिजिटल आणि ऑनलाइन शिक्षणाच्या युगात लहान मुलांचा मोबाईल व स्क्रीनशी संबंध वाढल्याने डोळ्यांच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचे डोळे सुरक्षित राहावेत आणि भविष्यात त्यांना कोणताही त्रास होऊ नये, या उदात्त हेतूने रवींद्र शिंदे यांनी या शिबिराचे आयोजन केले होते. या नेत्र तपासणी शिबिरामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांचे आरोग्य तपासण्यास मदत झाली असून, पालकांनी व शिक्षकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शितल सचिन शिंदे यांनी सांगितले की, रविंद्र शिंदे हे नेहमीच शाळेच्या विविध गरजांसाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अग्रेसर राहून मदत करत असतात.




### पळस हायस्कूल परिसरात वृक्षारोपण

**नागोठणे :** 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' ही शिकवण घेऊन चांगले विचार मनात येण्यासाठी वृक्षलागवड आवश्यक आहे. झाडे ही रात्री कार्बन डायऑक्साईड सोडतात, तर दिवसा आपल्याला ऑक्सिजन देतात. त्यामुळे झाडे लावणे आवश्यक आहे. नागपूरमध्ये नेहमी असणारे ४५ अंश तापमान यावर्षी आपल्या नागोठणे परिसरात आढळले. पळस विद्यालयाच्या आवारात आम्ही प्रायोगिक स्वरूपात ५ झाडे लावली आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावा. आईप्रमाणे त्यांचे संगोपन, जोपासना करा, असे भावनिक आवाहन नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष विलास चौलकर यांनी विद्यार्थ्यांना केले. लायन्स क्लब नागोठणे यांच्या वतीने आणि आदर्श नागरी पतसंस्था मर्यादित, अलिबाग यांच्या नागोठणे शाखेच्या सहकार्याने नागोठण्याजवळील पळस येथील पीएनपी माध्यमिक विद्यालयाच्या आवारात सोमवारी (दि.२०) सकाळी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी विलास चौलकर बोलत होते. यावेळी नागोठणे लायन्स क्लबच्या वतीने ८ वी ते १० पर्यंतच्या सुमारे १०० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### ज्येष्ठ नागरिक संघाची पावसाळी सहल



**नवी मुंबई :** नवी मुंबई सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांची पावसाळी सहल शुक्रवारी (दि.१७) कर्जत येथील एंजल रिसॉर्ट येथे गेली होती. या सहलीत १०० सभासद सहभागी झाले होते. यामध्ये ५५ महिला व ४५ पुरुष होते. कर्जत येथे रिसॉर्टवर पोहोचल्यानंतर बहुतेक सभासदांनी स्विमिंग पूलमध्ये पोहण्याचा आनंद घेतला. काहींनी नृत्य केले. दुपारी जेवणानंतर मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. याच कार्यक्रमांमध्ये महिलांची संगीत खुर्ची घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये अनेक महिलांनी सहभाग घेतला. या सहलीमध्ये संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव, राम काजरोलकर, सचिव जगदीश एकावडे, खजिनदार महादेव पाटील, उपाध्यक्ष लक्ष्मण गोळे, सीमा बोराडे, सहसचिव राजेंद्र कदम, राजाराम घोलप, मारुती कदम, विठ्ठल गव्हाणे, डॉ. विजया गोसावी, चंद्रकांत पारपिल्लेवार, विष्णूदास मुखेकर आदी सहभागी झाले होते.

### शैलेश निंबरे यांचा गौरव

**महाड :** इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाडतर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील आयएनटी अकॅडमी इंग्लिश हायस्कूलचे कला शिक्षक शैलेश शरद निंबरे यांना राष्ट्रीय स्तरावरील ''बेस्ट टीचर अवॉर्ड २०२५-२६'' ने गौरविण्यात आले आहे. यापूर्वीही विविध पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या निंबरे यांनी परीक्षा केंद्रावर तसेच शाळेत विद्यार्थ्यांना चित्रकला विषय, बाह्य परीक्षांचे महत्त्व आणि नियोजनबद्ध तयारीचे अमूल्य मार्गदर्शन केले. त्यांच्या या प्रभावी मार्गदर्शनामुळेच शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय यश संपादन करून महाड शहराचा नावलौकिक वाढवला आहे. ऑलिम्पियन चॅम्पियन पी. टी. उषा व संस्थेच्या संचालिका मधुमती एम. यांच्या स्वाक्षरीचे मानाचे प्रशस्तीपत्र देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.



### 'सल्ल्याशिवाय गोळ्या घेणे धोकादायक'

**कर्जत :** नेरळ येथील डॉ. शेवाळे यांच्या धन्वंतरी नर्सिंग होममध्ये शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. पराग लाड यांनी सामान्य रुग्णांसाठी हा महत्त्वाचा संदेश दिला. ते म्हणाले की, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कुठलेही वेदनाशामक गोळ्या घेणे आरोग्यास हानिकारक ठरू शकते. किडनी, हृदयरोगासारखे विकार वाढू शकतात. कर्जत मेडिकल असोसिएशनने डॉक्टरांसाठी आयोजित केलेल्या एका शैक्षणिक सत्रात अस्थिरोगामध्ये वेदनाशामक औषधे या विषयावर ते बोलत होते. अध्यक्ष डॉ. प्रशांत गांगल यांनी स्मृतीचिन्ह देऊन डॉ. पराग लाड यांचा सन्मान केला. रायगडचे माजी अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी, संपादक डॉ. कुमार ओसवाल, सुकाणू समिती सदस्य डॉ. प्रभाकर काळे, डॉ. बी.जी. लाड, डॉ. सुहास शितुत, डॉ. कुणाल राठोड, डॉ. जयश्री देशमुख, डॉ. नितिन भोपतराव, डॉ. राकेश पाटील, डॉ. गीता काळे, डॉ. रवींद्र गर्जे आणि नेक डॉक्टर्स यावेळी उपस्थित होते.

# निवडक



## प्रभाकर म्हात्रे यांचा सत्कार

**पेण** : पेण सराफ सुवर्णकार असोसिएशनचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर (हरीओम) म्हात्रे यांची जिल्हा परिषद सदस्यपदी निवडीबद्दल पेण येथे असोसिएशनच्या वतीने जाहीर सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात प्रभाकर म्हात्रे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र सराफ असोसिएशनचे उपाध्यक्ष कन्हैयालाल पुनमिया यांनी प्रभाकर म्हात्रे यांच्या कार्याचे कौतुक केले. मा. नगरसेवक संतोष पाटील यांनी प्रभाकर म्हात्रे यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकत सांगितले की, प्रभाकर म्हात्रे हे अत्यंत स्वच्छ, प्रामाणिक आणि सरळ मनाचे व्यक्तिमत्त्व आहे. यानंतर असोसिएशनच्या सदस्यांसाठी आयोजित लकी ड्रॉमध्ये १२ सदस्यांची नावे निवडण्यात आली. विजेत्यांना भेटवस्तू म्हणून छत्री देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. शेवटी स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## हृदय-फुफ्फुस पुनर्जीवन प्रशिक्षण

नवीन पनवेलः डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने अपोलो हॉस्पिटल्स यांच्या सहकार्याने (दि.२२) जुलै रोजी दादासाहेब धनराज विसपुते सभागृहात हृदय-फुफ्फुस पुनर्जीवन प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. अपोलो हॉस्पिटल्समधील अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांनी हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत हृदय-फुफ्फुस पुनर्जीवनाचे महत्त्व स्पष्ट करून प्रत्यक्ष प्रात्यक्षिक व हाताळणीद्वारे विद्यार्थ्यांना जीवनरक्षक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्कालीन परिस्थितीला योग्य प्रकारे प्रतिसाद देण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. या कार्यक्रमाला १,५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. अध्यक्ष धनराज विसपुते, सचिव संगीता विसपुते यांच्या प्रेरणा व सहकार्याने तसेच प्राचार्य डॉ. आशिष जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी अपोलो हॉस्पिटल्सच्या तज्ज्ञांचे, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे, प्राचार्य, प्राध्यापक, स्वयंसेवक तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मंथन परीक्षेत विंधणे शाळेला यश



**चिरनेर** : विंधणे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षी झालेल्या मंथन परीक्षेत उरण तालुक्यातून घवघवीत यश संपादन केले आहे. दुसरीत शिकणाऱ्या आर्या प्रीतम पाटील हिने उरण तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. तर शाळेतील तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या तेजस्विनी शैलेश नवाळे (प्रथम) चैतन्य भगवान पाटील (द्वितीय) आर्या संदीप पाटील (तृतीय) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेच्या शिक्षिका रंजना कोळी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचा सातत्यपूर्ण अभ्यास आणि शिक्षिकांची मेहनत यामुळे हे यश प्राप्त झाल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. शाळेच्या या नेत्रदीपक कामगिरीबद्दल गावातून कौतुकाचा वर्षाव होत असून, मुख्याध्यापक व ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंचासह सदस्यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षिका रंजना कोळी यांचे अभिनंदन केले.

## अवचितगड दर्शन मोहिम उत्साहात



**खांब** : रोहा तालुक्यातील शिववंदना वाचनालय वाशी यांच्या वतीने पावसाळी दुर्ग अवचितगड दर्शन मोहिम उत्साहात संपन्न करण्यात आली. शिववंदना वाचनालय गेली १० वर्ष वाचनालयाच्या माध्यमातून वाचन आणि छत्रपती शिवरायांचा इतिहास, तसेच गडकिल्ले संवर्धन का करावा हे विचार जणमाणसात पोहचवण्याचे कार्य करत आहेत. तर शिववंदना वाचनालयाचे संस्थापक प्रशांत बर्डे हे गेली १५ वर्ष शिवशंभु रोहा रायगड या गडाचा अखंड गडसंवर्धन करत आहेत त्यांनी आजपर्यंत ऊन, वारा पाऊस, थंडी, यांची कोणतीही तमा न बाळगता अथक परिश्रमाणे गडावरील वास्तूंचे संवर्धन केले आहे. तसेच गावातील भावी पिढीमध्ये शिवरायांचे तेजस्वी विचार आणि वाचन संस्कृती कायम टिकून राहावी यासाठी शिववंदना वाचनालचे संस्थापक यांनी नेहमी मार्गदर्शन करत असतात. तर दुर्ग अवचितगड मोहिमेच्या वेळी शिवचरित्र अभ्यासक प्रशांत बर्डे यांनी या श्रीमंत गडाचा इतिहास या भावी पिढीला सांगून गडकोट रक्षण का करावे,तसेच इतिहासाचा अभ्यास का करावा, याबाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेत मोठ्या संख्येने शिवप्रेमी युवक व युवती यांनी सहभाग घेऊन पावसाळ्यात दुर्ग दर्शन मोहिमेचा आनंद घेतला.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.
**मोबाईल** : ७५५९१८४६१२

● वाडगाव अलिबाग येथे विलावर राहण्यासाठी एक जोडपे हवे आहे. कृपया पुढील नंबर वर संपर्क करावा. ९८२२९३८४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# हुतात्म्यांच्या स्मारक दालनाची दुरवस्था

## दोन दिवसात सुशोभिकरण करण्याची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत पंचायत समितीच्या नव्या प्रशासकीय इमारतीत उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज, हुतात्मा हिराजी पाटील आणि हुतात्मा भाई कोतवाल यांच्या स्मारक दालनाची मागील वर्षभरापासून अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. छताची पडझड होऊनही प्रशासनाकडून याकडे होणारे दुर्लक्ष पाहता, राजकीय नेत्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि हुतात्मा भाई कोतवाल, हिराजी पाटील वापर केवळ 'राजकारणापुरताच' करायचा आहे का? असा संतप्त सवाल कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ यांनी उपस्थित केला आहे.

पुढील दोन दिवसात छत्रपती शिवाजीमहाराज आणि हुतात्म्यांच्या दालनाचे सुशोभीकरणाचे काम सुरू झाले नाही तर आम्ही स्वतः तेथे कामाला सुरुवात करू असा इशारा लेखी पत्राद्वारे दिला आहे.



२०१८ मध्ये पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यावर तत्कालीन सभापती अमर मिसाळ यांनी निधी उपलब्ध नसताना स्वखर्चाने छत्रपती शिवाजी महाराज आणि हुतात्म्यांच्या भव्य मूर्ती बसवून हे दालन सुशोभित केले होते. मात्र, गेल्या वर्षभरापासून या दालनाच्या छताचा काही भाग कोसळला असून पाण्याची गळती होत आहे. त्यानंतर अनेक सभापती, पंचायत समिती सदस्य आणि गटविकास अधिकारी आले अन् गेले, मात्र एकानेही या ऐतिहासिक स्मारकाच्या दुरुस्तीसाठी ठोस पावले उचलली नाहीत. गटविकास अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता 'निधी उपलब्ध नाही' असे उत्तर दिले जात आहे.

> पंचायत समितीच्या संकीर्ण लेखाशीर्षात दुरुस्तीसाठी १० ते २० हजार रुपयांचा निधी नक्कीच शिल्लक असतो. जर पंचायत समिती व विद्यमान लोकप्रतिनिधींना हे काम करणे शक्य नसेल, तर आम्हाला परवानगी द्यावी. आम्ही पुन्हा स्वखर्चाने या दालनाची दुरुस्ती करून हुतात्म्यांचा मान राखू. – अमर मिसाळ
> कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती

निवडणुकांमध्ये लाखो-करोडो रुपये खर्च करणारे राजकीय नेते आणि लोकप्रतिनिधी महापुरुषांच्या स्मारकाच्या किरकोळ दुरुस्तीसाठी काही हजारांचा निधी देऊ शकत नाहीत, ही कर्जत तालुक्यासाठी अत्यंत दुर्दैवी आणि खेदजनक बाब आहे. नेरळ येथील व्यापारी संकुलाला हुतात्म्यांचे नाव देण्याचा ठराव एकीकडे घेतला जात असताना, दुसरीकडे थेट पंचायत समितीच्या दालनातील स्मारकाची होणारी ही विटंबना प्रशासनाच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. या दुरावस्थेबाबत मिसाळ यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. छत्रपतींच्या आणि हुतात्म्यांच्या कृपेनेच आपण समाजात वावरत आहोत.

दरम्यान गटविकास अधिकारी सुशांत पाटील या प्रकाराची दखल घेऊन दालन दालनाची तात्काळ दुरुस्ती करणार की दुर्लक्षच कायम ठेवणार? याकडे संपूर्ण कर्जत तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# आदिवासी बांधवांना छत्र्यांचे वाटप

**| सोगाव | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्यातर्फे सोगाव व चोरोंडे येथील आदिवासी कुटुंबांना सोमवारी (दि.२०) जुलै रोजी छत्र्यांचे वाटप करण्यात आले. आदिवासी बांधवांप्रती आपुलकी, प्रेम व सामाजिक बांधिलकी जपणारे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी हे आदिवासींच्या उन्नती व विकासासाठी नेहमीच



विविध उपक्रम राबवित सर्व प्रकारची मदत करत असतात. आदिवासी बांधवांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना दरवर्षी पावसाळ्यात मोफत छत्र्या वाटप करत असतात. याहीवर्षी अलिबाग तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष सुनिल थळे व सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी सर्व आदिवासी कुटुंबांना छत्र्यांचे वाटप केले. सदर छत्री वाटप सुनिल थळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सतिश घाडी, सचिन घाडी समद कुर, चंद्रकांत खोत, राजेंद्र घरत, संजय शिंदे, विवेक जोशी, दिलीप मोंढे, संतोष बांद्रे, संजय अनमाने, शैलेश तिर्लोटकर सर, सुचित थळे, गितेश ठकरुळ, नितेश ठकरुळ, निकेश अनमाने, आशिष पाटील व सचिन घाडी मित्रमंडळाचे सर्व सदस्य व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फणसाड धरण बनले वर्षाविहाराचे आकर्षण



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात पावसाने दमदार हजेरीवाल्यामुळे फणसाड धरण तुडूब भरून वाहू लागले आहे. त्यामुळे वर्षाविहारासाठी ते पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरले आहे. मुरुड रस्त्यावर भोईघर फाट्यापासून अवघ्या ४कि.मी.अंतरावर असलेले हे धरण फणसाड अभयारण्यातून येणारे मोठे पाणलोट क्षेत्र असल्याने या परीसराला निसर्गाचे वरदान लाभले आहे.

धबधब्याचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठी मुंबई, पुणे, खोपोली, अलिबाग येथून मोठ्या प्रमाणावर पर्यटक याठिकाणी भेट देत असतात. कुटुंबासह येणारे निसर्गप्रेमी, युवा-युवकांचा यात वाढता उत्साह दिसून येतो. पर्यटकांमध्ये तरुणाई धांगडधिंगाणा, मद्यप्राशनाचे वाढते प्रकार आणि अतिउत्साह यामुळे वेळप्रसंगी अपघाताचे प्रसंग घडत असतात. महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागातर्फे धरणाच्या निषिध्द क्षेत्रात पाण्यात उतरण्यास व पोहोण्यास सक्त मनाई असल्याचे फलक लावण्यात आले आहेत. निसर्गप्रेमींनी येथील नियमांचे काटेकोरपणे पालन करुन वर्षाविहाराचा मनसोक्त आनंद लुटावा तसेच फणसाड धरणावर येणा-या पर्यटकांसाठी शासनाने याठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरीत आहे.

# महापालिका घेणार वर्गखोल्या भाड्याने

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

पालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण आणि पेणधर येथील शाळांतील विद्यार्थ्यांचे शिक्षण अखंडित सुरू राहावे, यासाठी तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर वर्गखोल्या उपलब्ध करून घेण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. या कामासाठी दोन वर्षांच्या कालावधीसाठी २४ लाख ६० हजार रुपयांच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याची मागणी करण्यात आली आहे.

गट शिक्षण विभाग (बांधकाम), पंचायत समिती पनवेल यांनी महापालिकेकडे याबाबत मागणी केली आहे. त्यानुसार फरशीपाडा येथील शाळेला स्वतःची इमारत नसून आडिवली, रोहिंजण आणि पेणधर येथील शाळांच्या इमारती पनवेल महापालिकेने धोकादायक घोषित केल्या आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांचे महापालिकेकडे हस्तांतरण अद्याप पूर्ण झाले नसल्याने विद्यार्थ्यांसाठी तातडीने पर्यायी व्यवस्था उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

चारही शाळांसाठी ७,५०० चौरस फूट जागा भाडेतत्त्वावर घेतली जाणार आहे. फरशीपाडा, आडिवलीसाठी प्रत्येकी १,००० चौरस फूट, रोहिंजणसाठी १,५०० चौरस फूट आणि पेणधरसाठी ५,००० चौरस फूट जागेची आवश्यकता आहे. या जागांसाठी दरमहा सुमारे २ लाख ५ हजार रुपये भाडे अपेक्षित असून दोन वर्षांचा एकूण खर्च २४ लाख ६० हजार रुपये इतका होणार आहे.

## पावसामुळे रस्त्याला खड्डे

**नवीन पनवेल** : पावसाळा सुरू झाल्यानंतर प्रवाशांना आणि नागरिकांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे रस्त्यावर पडणारे खड्डे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर खड्डे पडल्याने त्याचा त्रास प्रवाशांना होत आहे. यावर्षी पावसाळ्याला उशिरा सुरुवात झालेली असली तरी गेल्या काही दिवसांपासून चांगला पाऊस कोसळत असल्याने अनेक ठिकाणचे रस्ते खड्ड्यात गेले आहेत.

# मराठी पाट्यांसाठी मनसे पुन्हा आक्रमक



**| महाड | प्रतिनिधी |**

महाड शहरातील व्यापारी आस्थापना आणि व्यावसायिकांनी मराठी भाषेतील फलक (पाट्या) शासनाच्या नियमानुसार मोठ्या आणि स्पष्ट अक्षरांत लावाव्यात, या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पुन्हा आक्रमक झाली आहे.

या संदर्भात मनसेचे महाड शहराध्यक्ष पंकज उमासरे यांनी महाड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन देत, एक महिन्याच्या आत सर्व पाट्या नियमानुसार मराठीत लावाव्यात, अशी मागणी केली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि राज्य शासनाच्या नियमानुसार सर्व व्यावसायिक आस्थापनांवर मराठी भाषेतील फलक मोठ्या अक्षरांत असणे बंधनकारक आहे. मात्र, महाड शहरात अनेक ठिकाणी या नियमाचे उल्लंघन होत असल्याचे मनसेने निदर्शनास आणून दिले.

यावेळी महाड तालुकाध्यक्ष मंगेश शिंदे, अमोल दळवी, पंकज उमासरे, अथर्व देशमुख, शंतनु पिसाट, रस्ते शेखर सावंत, प्रदीप पिसाट यांच्यासह मनसेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अलार्ममुळे रायगडवासीयांची उडाली तारांबळ

**पाली /बेणसे** : रायगड जिल्ह्यातील नागरिकांच्या मोबाईलवर मंगळवारी (दि.२१) अचानक एक अलर्ट अलार्म वाजू लागल्याने आणि स्क्रीनवर आपत्कालीन संदेश झळकल्याने एकच घबराट पसरली. काय घडत आहे हे न कळल्यामुळे काही वेळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दुपारच्या सुमारास अचानक बहुतांश लोकांच्या मोबाईलवर मोठ्या आवाजात धोक्याचा अलार्म वाजू लागला. यामध्ये पुढील ३ तासांत रायगडमधील काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. नागरिकांनी सतर्क राहावे आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मंत्रालय, मुंबई असा स्पष्ट इशारा देण्यात आला होता. हा मेसेज आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणातर्फे थेट मोबाईल नेटवर्कवरून पाठवण्यात आला होता. यामुळे काही वेळ सर्वजण भांबावून गेलो होते.

# सुदर्शन सहकारी भात गिरणीची कार्यकरणी जाहीर



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मांडळा येथील मरहूम भाईसाहेब घय्ये सभागृहात मंगळवारी (दि.२१) जुलै रोजी सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ लि. मांडला संस्थेच्या सभापती पदाची निवड घेण्यात आली.

मुरूड-जंजिरा सहकारी अधिकारी, सहाय्यक निबंधक कार्यालय मुरूडचे प्रमोद वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली व सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ, मांडलाचे मॅनेजर अरूण महादेव घरत यांचे सहकार्य लाभले.

सुदर्शन सहकारी भात गिरण व भात खरेदी विक्री संघ, मांडला संस्थेच्या रिक्त असलेल्या सभापती पदासाठी संचालक जाकीर अली हमदुले यांच्या ऐकमेव अर्ज प्राप्त झाल्याने, निवडणुक अधिकारी प्रमोद वाघमारे यांनी जाकीर अली हमदुले यांची सभापती पदासाठी बिनविरोध निवड जाहीर केली.

या निवडणुकीसाठी उपसभापती रफायल लुविज वेगस, संचालक संतोष गोमा कांबळी, संचालक प्रदिप कमळया धनावडे, संचालिका यास्मीन आताउल्ला घय्ये, फैयाज हुसेन दळवी, लक्ष्मी थळे, निस्सार इसुफ नाईक, मंगेश पुरूषोत्तम थळे, व अरूण महादेव गुरव यांनी निवडणुक प्रक्रियेत सहभाग घेतला होता.

जाकीर अली हमदुले यांची बिनविरोध निवड झाल्याने उपस्थित निवडणुक अधिकारी प्रमोद वाघमारे, उपसभापती, संचालक, संचालिका, मॅनेजर यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अजितदादांना आदरांजली




**रोहा** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बुधवारी (दि.२२) जुलै रोजी रोहा शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ज्येष्ठ नागरिक सभागृहात जयंती करण्यात आली होती. यावेळी नगराध्यक्षा वनश्री शेडगे, उपाध्यक्ष अहमद दर्जी, तालुका कार्याध्यक्ष समीर शेडगे, जिल्हा उपाध्यक्ष समीर सकपाळ, महेंद्र गुजर, सभापती महेंद्र दिवेकर, नीता हजारे, रविंद्र चाळके, नगरसेवक अजित मोरे, प्रशांत कडू, माझ सवाल, नगरसेविका पूर्वा मोहिते, उमेश लोखंडे, अलीम मुमेरे, स्वप्नील धनावडे, प्रेषित बारटक्के, समीक्षा बामने, प्राजक्ता चव्हाण, परशुराम चव्हाण, अकीफ येरूणकर,निलेश शिर्के आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन | नाविन्यपूर्ण संशोधन करण्याचे आवाहन

# अॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेजमध्ये कन्व्हेन्शन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जनता शिक्षण मंडळ संचलित अॅड. दत्ता पाटील लॉ कॉलेज, अलिबाग येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQ-C) आणि मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने २१ व्या आविष्कार संशोधन कन्व्हेन्शन अनुषंगाने जिल्हास्तरीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेच्या उद्घानप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील, आविष्कार रिसर्च कन्व्हेन्शनच्या ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी डॉ. मीनाक्षी गुरव, हर्बल रिसर्च लॅब अँड निमल टेस्टिंग इन्चार्ज डॉ. सुनीता शैलजन, इन्स्टिट्यूट ऑफ ड्व्हान्स ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च इन



इंटरडिसिप्लिनरी सायन्सेसचे संचालक डॉ. ससिकुमार मेनन, जिल्हा समन्वयक डॉ. दिनेश भगत तसेच सहाय्यक समन्वयक डॉ. जगदीश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

रायगड विभागातील कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट आणि अभियांत्रिकी शाखांतील २० महाविद्यालयांमधील सुमारे ६० प्राध्यापकांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला. संपूर्ण कार्यशाळेचे सात सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविकात डॉ. सुनिल पाटील यांनी मुंबई विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन स्पर्धेची यशस्वी वाटचाल उलगडून सांगत प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण, समाजाभिमुख आणि नाविन्यपूर्ण संशोधन करण्याचे आवाहन केले. संशोधन करताना शास्त्रीय दृष्टिकोन, गुणात्मक अभ्यासपद्धती आणि समस्याकेंद्रित विचार आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

आविष्कार स्पर्धेची पात्रता, नियमावली, विविध स्तर, पारितोषिके तसेच संशोधनासाठी विषय निवड, संशोधन समस्या निश्चिती, संशोधन पद्धती, माहिती संकलन, विश्लेषण आणि उपाययोजना याविषयी डॉ. मीनाक्षी गुरव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. सुनिता शैलजन आणि डॉ. ससिकुमार मेनन यांनी पॉवर पॉईंट सादरीकरणाच्या माध्यमातून प्रभावी संशोधन कसे करावे, संशोधनाची मांडणी, समस्या विश्लेषण आणि निष्कर्ष लेखन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी प्राध्यापकांचे विविध संघ तयार करून प्रत्यक्ष कृतीशील संशोधनाचे प्रशिक्षण दिले.

कार्यशाळेतील सातही सत्रांमध्ये डॉ. मीनाक्षी गुरव, डॉ. सुनीता शैलजन आणि डॉ. ससिकुमार मेनन यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड. गौतम पाटील, उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील, सचिव गौरव पाटील, प्रभारी प्राचार्या डॉ. नीलम हजारे तसेच समन्वयक प्रा. निलम म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. संदीप घाडगे यांनी आविष्कार समन्वयक म्हणून नियोजनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. तसेच प्रा. पियुषा पाटील, प्रा. चिन्मय राणे, प्रा. कौशिक बोडस, प्रा. सुरज पुरी, प्रा. हर्षदा चेवले, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्यामुळे कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक अनुज अजय प्रधान व श्रीमती अनुप्रिया अजय प्रधान दोघे रा. फ्लॅट नं.८०४, राधाकृष्ण को. ऑप. हौ. सोसायटी, विसर्जन तलावासमोर, दामु अण्णा दाते मार्ग, कांदिवली व्हीलेज, व्ही.टी.सी. मुंबई, पो. कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७ यांच्या नांवे असलेली खालील वर्णनाची मिळकत मी खालील सही करणार यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा ठराव विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सुरई ता.अलिबाग | ३१० | ०-१७-००<br>पो.ख.०-०१-००<br>एकूण ०-१८-०० | ०.२८ |

सबब सदरहू जागा, जमिन व मिळकतींमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे. असे गृहीत धरुन मी खरेदीदार या नात्याने वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करीन व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०७/२०२६

सही /-
**श्री. हनुमान प्यारेलाल गुप्ता**
रा. रुम नं. सी ५०३, ज्ञानदिप
स्कूलशेजारी, सेक्टर २, नवी मुंबई, ऐरोली, ठाणे.
मो.नं. ९७०२५३७४५१
(खरेदीदार)

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वरसोली, अलिबाग, जि. रायगड, येथील सर्व्हे नंबर ४९/७, एकूण क्षेत्र २-००-०० आर. चौ. मीटर, आकार २०.०० रू. पैसे ही बिनशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक मयुर मेघजी डेढिया रा. पिंपळभाट, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू बिनशेती मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २२/०७/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राह्मण आळी, अलिबाग, ता.अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

आमचे पक्षकार 'सुनिल शंकरलाल आस्कनानी' व 'अनिशा सुनिल आस्कानानी' यांच्याकडून खालील वर्णनित 'कृषक जमीनी' संबंधी करार झाला आहे व पुढील व्यवहारिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या विचारात आहेत, तरी खालील 'कृषक जमीनी' विषयी कोणाही व्यक्ती/व्यक्तींनी/संस्था/बँक/भागीदारी संस्था/वारस/गहाणदार यांचे कुठलेही हितसंबंध असल्यास संबंधित व्यक्ती/व्यक्तीं/संस्था/बँक/भागीदारी संस्था/वारस/गहाणदार बँक/संस्था यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत योग्य पुराव्यासह लेखी हरकती असल्यास आवश्य नोंदवाव्यात. अन्यथा आमचे पक्षकार सदरच्या कृषक जमीनीचा व्यवहार संपूर्ण शीर्षक स्पष्ट असल्याचे समजून पुर्ण करण्यात येईल याची गंभीर नोंद घ्यावी.

**कृषक जमिनीचे वर्णन**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| अनु क्र. | गट क्र. | हे-आर-पॉ | स्थळ |
| १. | १८५ पैकी | ००-९०-०० | गाव शेणवळी, तालुका तळा, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य, इंडिया. |
| २. | २९/९ पैकी | ०२-१०-०० | |

दिनांक : २३ जुलै, २०२६
स्थळ : पनवेल

**ADV. PRADEEP INGOLE,**
Reg. No. MAH/1672/2010
B. Arch., LL.B., D.V. (Real Estate).
D. (Cyber Law). D. (Human Rights)
Office: 102, Shree Sahayya
Elite, Beside Prachin Hospital. Thana Naka,
Panvel, Dist.Raigad - 410 206.
Mob.: +919890291800
Email: legal.10tech@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) गिरीजा प्रकाश ओक, २)मधुवंती प्रकाश ओक ३) विजय दत्तात्रेय ओक सर्व रा. आंबिवली खुर्द, ता. महाड, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आंबिवली खुर्द ता.महाड | ४१/२/१ | २-८३-००<br>पो.ख.०-४३-००<br>एकूण ३-२६-०० | ०-८८ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २२-०७-२०२६.

सही/-
**ॲड. जयेश गणेश पवार**
रा.मु.पो.अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-महाजने, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाचे जमीन मिळकत १ श्री. बाळकृष्ण उर्फ कृष्णा गणपत पारंगे २ श्री. रामचंद्र गणपत पारंगे, ३. सौ. विनया विनायक भोनकर, ४. सौ. रोशनी रमेश भोपी रा. महाजने,पो.मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| महाजने, ता.अलिबाग, जि. रायगड | १८८ | १-२१-००<br>पो.ख.०-१७-००<br>एकूण क्षेत्र १-३८-०० | २.६० |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०-७०-०० हे. आर जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर संपूर्ण जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकत किंवा त्यापैकी कोणत्याही भागावर कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक: २२/०७/२०२६

सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो.९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## यशवंत विद्यापीठ कराड

**(जैन धार्मिक अल्पसंख्यांक संस्था)**
**२७१, मंगळवार पेठ कराड ता.कराड जि. सातारा, पिन - ४१५११०**

### पाहिजेत

संस्थेच्या सातारा व रायगड जिल्हयातील खालील अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये रिक्त जागांवर व संभाव्य रिक्त होणाऱ्या जागांवर सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे पदे भरणे आहेत.

१. इंदिरा कन्याप्रशाला मसूर ता.कराड जि.सातारा
२. भिकोबा पाटील हायस्कूल चिखली ता.कराड जि.सातारा.
३. श्रीमती सुभद्राबाई म. पाटील माध्यमिक विद्यालय वरवणे ता. पेण जि.रायगड
४. रामभाऊ म. वागळे विद्यालय धामणसई ता.रोहा जि.रायगड

| अ.क्र. | विषय | गट | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सहा.शिक्षक (शिक्षण सेवक) अनुदानित | इ.६वी ते इ.८वी | M.A./ B.A. B.Ed. (मराठी/भुगोल) & TET Pass Compulsary | ०१ |
| २ | सहा. शिक्षक (शिक्षण सेवक) अनुदानित | इ.९वी ते इ.१० वी | M.Sc./B.Sc. B.Ed. (गणित/विज्ञान) | ०१ |
| ३ | सहा.शिक्षक (शिक्षण सेवक) अनुदानित | इ.६ वी ते इ.८वी | M.A./B.A.B.Ed. & TET Pass Compulsary | ०१ |
| ४ | सहा.शिक्षक (अंशतःअनुदानित) | इ.५वी | D.El.Ed. & TET Pass Compulsary | ०१ |

टीप :- १. वेतन व सेवाशर्ती शासकीय नियमाप्रमाणे राहतील.
२. जैन अल्पसंख्यांक उमेदवारांना प्राधान्य राहील.
३. वरील सर्व नेमणुका संबंधीत मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) व मा.उपसंचालक सो यांच्या मंजूरीच्या अधिन राहतील.

तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी परिपूर्ण अर्ज शैक्षणिक कागदपत्रासह दि. ०१/०८/२०२६ पर्यंत संस्थेच्या वर उल्लेख केलेल्या पत्त्यावर पाठवावेत.

**सेक्रेटरी**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-नावंढे, ता. खालापूर. जि.- रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| लोकेश देवकिसन जाखोटिया<br>सुनील महादू पिंगळे | २२५/३ | ७-००-०० | ७०.०० |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
'सीता-सदन' वाकण, पो.-पाटणसई,
ता.-रोहा, जि.रायगड, ४०२१०६
मो. क्र. ७७७५८९०४५५,

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे चई, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. काशिनाथ वामन कराळे | ३४ | ३ | २-६०-०० | १ | ६६ |
| | सदरील मिळकतींपैकी हे.आर.चौ.मी.०-४०-०० इतके क्षेत्राची मिळकत | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहीला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत
नगरपालीका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २३/०७/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड

ज.म.र.अर्ज ४०२/२०२६

### जाहिर नोटीस

प्रति
श्रीम. सईदा अहमद सरिफ घारे,
रा. मांडला, ता. मुरुड-जंजिरा, — अर्जदार
जि. रायगड
विरुद्ध
निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मांडला,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. २१-०१-१९६८ रोजी मौजे मांडला, ता.मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २१-०१-१९६८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रूपम सिद्धेश्वर पाटील यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कुरकुंडी कोलटेंभी, ता. अलिबाग | १३९/१ | ०-२१-७० जिरायत<br>०-००-०० पो.ख.<br>०-२१-७० एकुण | ४.७५ |

वर्णन केलेल्या जमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०-०२-०० हे. आर. हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २२/०७/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११(डी ११ )**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाड चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०८.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री देवेन्द्रनाथ वामन पाटील व सुवर्णा देवेन्द्रनाथ पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०६/११/२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ५,५५,५५४/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १०.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री देवेन्द्रनाथ वामन पाटील व सुवर्णा देवेन्द्रनाथ पाटील यांच्या नावे असलेली मिळकत क्र ५७/अ व ५७/ब येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०६/११/२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ५,५५,५५४/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- देवेन्द्रनाथ वामन पाटील व सुवर्णा देवेन्द्रनाथ पाटील**

ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग मधील श्री देवेन्द्रनाथ वामन पाटील व सुवर्णा देवेन्द्रनाथ पाटील यांच्या नावे असलेली मिळकत क्र ५७/अ ६४.०० चौ मी व ५७/ब क्षेत्र ६४.०० चौ मी हे घर

स्थळ : अलिबाग
**दिनांक : २२/७/२०२६**

**श्री के.के. राऊत**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. श्री. मनीष रमेश खुशलानी २. रमेश गोपालदास खुशलानी दोघेही रा. चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग | ८१/ब/८३/ब/८६/ब/३/२ | १३.७३.९८ | २७५.०० |
| चेंढरे, ता.अलिबाग | ८६/१/७ | ०.४७.०० | ९.४० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २२-०७-२०२६.

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

## - जाहीर नोटीस -

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे सुचित करणेत येते की, आमचे अशिल-सचिन कमळाकांत श्रृंगारपुरे, रा.रामसिता कुंज, प्रभू आळी, पेण, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी अलिबाग येथील स्पेशल मुकदमा नं. १६९/२००९ चा दावा श्री.चंद्राकांत रामभाऊ घोडविंदे, श्री.सुरेश रामभाऊ घोडविंदे, श्री. बळीराम रामभाऊ घोडविंदे, श्री.शशिकांत रामभाऊ घोडविंदे, सौ.अंजना काळूराम लबडे, श्री. विजय बाबू पाटील, सौ.स्मिता धनंजय पाटील, कु.प्रियांका धनंजय पाटील व श्री.धनंजय कृष्णा पाटील यांचेविरूद्ध मौजे कुरमुर्ली ता. पेण, जि. रायगड येथील सर्वे नं.७३/१अ या मिळकती संदर्भातील दिनांक ०९.०९.१९८८ रोजीच्या साठेकराराची विशेष पूर्तता करून मिळणेकरीता व इतर अनुषंगिक मागण्यांकरीता दाखल केला होता. सदरचा दाव्याचे कामी दिनांक १८.०३.२०१४ रोजी निकाल आमचे अशिलांचे बाजूने होऊन सदर दावा मंजूर करणेत आला. सदर निकालाविरूद्ध वर नमूद श्री. चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैरे यांनी मुंबई उच्च न्यायालयात पहिले अपील नं. ७३६/२०१४ चे अपील दाखल केले. त्याकामी ना.उच्च न्यायालयाने श्री.चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैरे यांनी वर नमूद मिळकत म्हणजे दावा मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारे त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करू नयेत व विकू नयेत असा मनाई हुकूम दिनांक २८.१.२०१५ रोजी अपील ॲडमिट करतेवेळी केलेला आहे व तो आदेश आजही अस्तित्वात आहे. त्यानंतर आर्थिक अधिकारक्षेत्रामध्ये बदल झाल्यामुळे सदरचे अपील हे जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग येथे वर्ग करणेत आले व त्यास दिवाणी अपील नं. १८९/२०१६ असा नवीन नंबर देणेत आला व सदरचे अपील प्रलंबित आहे. तसेच वर नमूद मिळकती संदर्भात श्री. चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैरे यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधीकरण, मुंबई येथे टेनन्सी/रिव्हि./२६२/२०२२ चा रिव्हिजन अर्ज देखील प्रलंबित आहे. असे असतानाही सदर श्री.चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैरे ९ असे सर्वजण कुळांबरोबर संगनमत करून, वर नमूद मिळकतीसंदर्भात तिऱ्हाईत इसमांचे हक्क निर्माण करू पहात आहेत अशी आमचे अशिलांना खात्रीपूर्वक माहिती मिळाली आहे. वास्तविक वर नमूद न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असताना व आमचे अशिलांचे लाभात हुकुमनामा झालेला असताना श्री. चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैरे ९ यांना कुळांबरोबर संगनमत करून तिऱ्हाईत इसमांचा हक्क निर्माण करणेचा कोणताही अधिकार नाही. सबब वर नमूद मिळकतीसंदर्भात वर नमूद श्री. चंद्रकांत रामभाऊ घोडविंदे वगैर यांचेबरोबर व/वा अन्य कोणाबरोबरही कोणीही, कोणत्याही स्वरूपाचे व्यवहार करू नये, तसे व्यवहार केल्यास ते व्यवहार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच तसे कोणतेही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत आणि ते कायदेशीर कारवाईस पात्र असतील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- २०.०७.२०२६

सही/-
**(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
कार्यालय- ए-१०१/१११, त्रिमुर्ती प्लाझा,
बीच रोड, अलिबाग को.ऑप.अर्बन बँकेसमोर,
अलिबाग, जि. रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे मुळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे मालक सागर चंद्रकांत म्हात्रे वगैरे रा. वेश्वी, संतोषी माता मंदिराजवळ, ता.अलिबाग, जि.रायगड यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून दयावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मुळे, तालुका अलिबाग येथे भूमापन क्रमांक व उपविभाग ८७ एकूण क्षेत्र २-२५-०० हे.आर. आकार रु.०-०० पै. ही मिळकत**

अलिबाग,
दिनांक : २२.०७.२०२६

सही/-
**(ॲड.श्री.प्रसाद विजय वर्तक)**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग-रायगड.**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११ )**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रेवदंडा चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०६.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ प्राणिता प्रवीण मानकर यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०७/११/२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ३,७७,४७२/- व दिनांक ०१.०६.२०२५ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा ता. अलिबाग मधील श्री प्रवीण कृष्णा मानकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र २२३६ अ १ व मौजे रेवदंडा हद्दीतील भुमापण क्र व उपविभाग ६०/२१ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०७/११/२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ३,७७,४७२/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ प्राणिता प्रवीण मानकर**

ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा ता. अलिबाग मधील श्री प्रवीण कृष्णा मानकर यांच्या नावे असलेली मिळकत क्र २२३६ अ १ क्षेत्र १५८ चौ फु व मौजे रेवदंडा हद्दीतील श्री प्रवीण कृष्णा मानकर, श्री मधुकर नारायण मानकर, सौ सुरेखा कृष्णा मानकर, श्री प्रशांत कृष्णा मानकर, श्री प्रमोद कृष्णा मानकर व श्री मनोहर नारायण मानकर यांचे नावे असलेली भुमापण क्र व उपविभाग ६०/२१ क्षेत्र ०.७०.०० हे आर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २२.०७.२०२६

**श्री के. के. राऊत**
**विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्युम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# बुद्धिबळ खेळाच्या विकासासाठी ऐतिहासिक पाऊल

**रोह्यात चेस असोसिएशनची स्थापना | अध्यक्षपदी प्रमोद म्हसकर यांची निवड**

| चणेरा | प्रतिनिधी |

जागतिक बुद्धिबळ दिनाचे औचित्य साधत रोहा तालुक्यात बुद्धिबळ खेळाच्या विकासासाठी ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. बुद्धिबळाचा ग्रामीण भागात प्रसार, नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन, दर्जेदार प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रोहा तालुका चेस असोसिएशन (आरटीसीए) ची स्थापना करण्यात आली. या नव्या संघटनेच्या अध्यक्षपदी सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात सक्रिय असलेले प्रमोद म्हसकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



या नव्या कार्यकारिणीत संकेत खोत यांची कार्याध्यक्ष, अमर सलागरे यांची उपाध्यक्ष, विक्रांत जाना यांची सचिव, विवेक कांबळे यांची सहसचिव, महेश बामुगडे यांची खजिनदार, तर योगेश भगत यांची सहखजिनदार म्हणून निवड करण्यात आली. तसेच, कार्यकारिणी सदस्य म्हणून आभूषण मिठागरी, विवेक कानडे, ओमकार पवार, अनिकेत पाशिलकर, प्रशांत देशमुख, सुधीर जंगम, रविंद्र कान्हेकर आणि रोहन चव्हाण यांचा समावेश करण्यात आला आहे. रोहा तालुक्यातील बाल व युवा बुद्धिबळपटूंना नियमित प्रशिक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि राष्ट्रीय स्तरावील स्पर्धांसाठी आवश्यक तयारी मिळावी यासाठी पी. एम. चेस अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. म्हसकर यांच्या पुढाकारातून साकार होणाऱ्या या अकॅडमीमधून जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील गुणवंत बुद्धिबळपटू घडविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.

नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद म्हसकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या पुरस्कारातून दि. ९ ऑगस्ट रोजी रोहा येथे भव्य खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सुमारे २०० खेळाडूंना सहभागी होण्याची संधी मिळणार असून, खुल्या गटासाठी १०० रुपये नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे १६ वर्षांखालील सर्व खेळाडूंना प्रवेश पूर्णपणे मोफत देण्यात आला असून, युवा बुद्धिबळपटूंना प्रोत्साहन देण्याचा हा महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात सातत्याने विधायक उपक्रम राबविणारे म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली रोहा तालुका चेस असोसिएशन बुद्धिबळाची चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचा निर्धार नूतन कार्यकारिणीने व्यक्त केला आहे. जागतिक बुद्धिबळ दिनी झालेली असोसिएशनची स्थापना, ९ ऑगस्टला होणारी भव्य स्पर्धा आणि पी. एम. चेस अकॅडमीची घोषणा यामुळे रोहा तालुक्यात बुद्धिबळ खेळाला नवी ऊर्जा, नवे व्यासपीठ आणि उज्ज्वल भविष्य मिळणार असल्याची माहिती असोसिएशनचे उपाध्यक्ष अमर सलागरे यांनी दिली.

# चायना ओपनमध्ये सिंधूकडे नेतृत्व

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

जपान ओपन सुपर ७५० विजेतेपद जिंकल्यानंतर आत्मविश्वास वाढलेली भारताची स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू, मंगळवारपासून सुरू होणाऱ्या चायना ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या आव्हानाचे नेतृत्व करत आहे. मात्र, भारताची अव्वल पुरुष दुहेरी जोडी सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी दुखापतीमुळे या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभागी होणार नाहीत. सात्विकची जुनी खांद्याची दुखापत पूर्णपणे बरी झालेली नाही, त्यामुळे दोन्ही बॅडमिंटनपटूंनी आगामीजागतिकबॅडमिंटन चॅम्पियनशिपवर लक्ष केंद्रित करण्यासाठी चायना ओपनमधूनमाघारघेतलीआहे. दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधूने गेल्या आठवड्यात जपान ओपनमध्ये जवळपास दोन वर्षांनंतर बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूरचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात तिने जपानच्या तीन वेळच्या विश्वविजेत्या अकाने यामागुचीचा सरळ गेममध्ये पराभव केला. यावेळी जर तिने तिचा पहिला सामना जिंकला, तर दुसऱ्या फेरीत तिचा सामना चीनच्या चौथ्या मानांकित चेन यू फेईशी होऊ शकतो. परंतु, हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे चेनला अलीकडेच जपान ओपनच्या उपांत्य फेरीतून माघार घ्यावी लागली. दरम्यान, रोहन कपूर आणि रुथविका शिवानी गड्डे यांचा सामना अव्वल मानांकित चिनी जोडी फेंग यान झे आणि हुआंग डोंग पिंग यांच्याशी होईल. पुरुष दुहेरीमध्ये, हरिहरन अम्मास्करुनन आणि एम.आर. अर्जुन पहिल्या फेरीत चीनच्या चौथ्या मानांकित लियांग वेई केंग आणि वांग चांग यांच्याविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करतील.



## निवडक

### सिराजच्या अंगावर पोलिसांची वर्दी




**नवी दिल्ली** : आयर्लंड आणि त्यानंतर इंग्लंडच्या दौऱ्यावर भारतीय संघाला एका गोलंदाजाची उणीव प्रकर्षाने जाणवली. तो खेळाडू जेव्हा जेव्हा भारतीय जर्सी घालून मैदानात उतरतो, तेव्हा त्याच्या खेळात वेगळीच आक्रमकता पाहायला मिळते, मग जर्सी पांढरी असो किंवा निळी. हा खेळाडू म्हणजे वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज. भारतीय संघाकडून ब्रेक घेतलेल्या सिराजने या काळात एका वेगळ्याच रूपात दर्शन दिले. क्रिकेटच्या मैदानावर आपल्या भन्नाट वेगाने फलंदाजांची दांडी उडवणारा ''मियाँ भाई'' म्हणजेच मोहम्मद सिराज आता एका नव्या आणि अत्यंत आदराच्या भूमिकेत दिसत आहे. नुकताच त्याने तेलंगणा पोलिसांमध्ये पोलीस उपअधीक्षकपदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर सिराजने सोशल मीडियावर खाकी वर्दीतील एक फोटो शेअर करत ''डीएसपी मोहम्मद सिराज रिपोर्टिंग फॉर ड्युटी'' असे कॅप्शन दिले. त्याच्या या पोस्टने क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतले आहे. एरवी मैदानावर आक्रमक दिसणारा सिराज तसा शांत स्वभावाचा आहे. परंतु, त्याच्या या खाकी वर्दीने त्याच्या संघर्षाची आणि यशाची गती स्पष्टपणे दाखवून दिली आहे.

### एकदिवसीय क्रमवारीत भारताचा दबदबा

**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघाने काही दिवसांपूर्वीच इंग्लंड दौऱ्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळली. परंतु, या सामन्यात भारतीय संघाला २-१ अशा फरकाने पराभवाचा सामना करावा लागला. या मालिकेतील लॉर्ड्सवर निर्णयाक तिसरा सामना झाला होता, ज्यात इंग्लंडने दिलेल्या ३८८ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला ३६० धावा करता आल्याने २७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. मात्र, असे असले तरी लॉर्ड्सवर रोहित शर्मा, शुभमन गिल आणि विराट कोहली यांनी चांगली कामगिरी केली होती, त्याचा फायदा आता त्यांना एकदिवसीय क्रमवारीत झाला आहे. बुधवारी आयसीसीने नवी एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली. या क्रमवारीत शुभमन गिल दुसऱ्या क्रमांकावर कायम असला तरी तो आता पहिल्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलच्या खूप जवळ पोहचला आहे. मिचेलचे रेटिंग पॉइंट्स ८०२ आहे, तर शुभमन गिलचे रेटिंग पॉइंट्स ८०१ आहे. तसेच, लॉर्ड्स एकदिवसीय मालिकेत रोहित शर्माने १३८ धावांची दमदार खेळी केली होती, तर विराट कोहलीने इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या आणि तिसऱ्या वनडेत अर्धशतके केली होती. त्यामुळे विराट ७६७ रेटिंग पॉइंट्ससह दुसऱ्या आणि रोहित शर्मा ७५८ रेटिंग पॉइंट्ससह चौथ्या क्रमांकावर कायम आहे. परंतु, आता अव्वल क्रमांकासाठी या चौघांमध्ये काट्याची टक्कर असणार आहे.

### अखेर झिम्बाब्वेचा संघ जाहीर

**नवी दिल्ली** : भारत-झिम्बाब्वे यांच्यातल्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला गुरुवारपासून सुरूवात होत आहे. या मालिकेसाठी भारतीय संघ झिम्बाब्वेत दाखल झाला आहे आणि सरावालाही लागला. त्यात आज सामना अन् काल झिम्बाब्वेने त्यांचा १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. झिम्बाब्वेने नुकतीच बांगलादेशविरुद्धची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकून इतिहास रचला आणि आता भारताला टक्कर देण्यासाठी ते सज्ज झाले आहेत. या विजयी संघातील तीन खेळाडूंना भारताविरुद्ध विश्रांती देण्यात आली असून, अनुभवी व तगड्या खेळाडूंना बोलावण्यात आले आहे. झिम्बाब्वेचे भारताविरुद्ध दि.२३, २५ आणि २६ जुलै रोजी टी-२० सामने हरारे स्पोर्ट्स क्लब येथे खेळले जातील. अष्टपैलू वेस्ली माधेवेरेचे संघात पुनरागमन झाले आहे, तर यष्टीरक्षक-फलंदाज तफदूझवा त्सिगाला पहिल्यांदाच टी-२० आंतरराष्ट्रीय संघात स्थान मिळाले आहे. दुखापतीमुळे बांगलादेशविरुद्धच्या मालिकेला मुकलेला जलदगती गोलंदाज न्यूमन न्यामहुरीचे पुनरागमन झाले आहे. तनका चिवांगाने आपले स्थान कायम ठेवले आहे. क्लाइव्ह मदंडे, टिनोटेंडा मापोसा आणि ताशिंगा मुसेकिवा या तिघांना भारताविरुद्धच्या मालिकेला मुकावे लागले आहे. सिकंदर रझाच्या नेतृत्वाखालीच हा संघ खेळणार आहे.

# बीसीसीआयने घेतले मोठे निर्णय

| मुंबई | प्रतिनिधी |

बीसीसीआयने काही नियमांबाबत मोठे निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. हे नियम नव्या २०२६-२७ हंगामापासून लागू होणार असल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीसीसीआयने राज्य संघटनांना या सुधारणांचे वितरण केले असून, क्रिकेटचे नियम निश्चित करणाऱ्या मेरीलेबोन क्रिकेट क्लबने प्रस्तावित केलेले हे बदल आहेत.



बीसीसीआय लागू करणार असलेल्या नियमांनुसार एखाद्या गोलंदाजाने मुद्दाम फ्रंट फुट नो-बॉल टाकला किंवा चेंडू खेळपट्टीच्या बाहेर किंवा लँड न होणारा चेंडू टाकला, तर त्या गोलंदाजाला उरलेल्या संपूर्ण सामन्यासाठी निलंबित केले जाणार आहे. इतकेच नाही, तर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये दिवसाच्या शेवटच्या षटकात जर गडी बाद झाला, तर खेळ तिथेच थांबवला जात होता. मात्र आता, ते षटक पूर्ण केल्यानंतरच खेळ थांबवला जाऊ शकतो. तसेच, यापूर्वी जर एखाद्या सामन्याचा निकाल लागणार नाही, असे लक्षात आले तर शेवटच्या डावातील खेळ तिथेच थांबवण्याचा निर्णय संघ घ्यायचे. परंतु, या नियमाचा गैरवापर करून कृत्रिम निकाल लावले जात असल्याची चिंता होती. त्यामुळे हा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचबरोबर एकदिवसीय सामन्यात ड्रिंक्स ब्रेकदरम्यान मुख्य प्रशिक्षकांना खेळपट्टीवर जाण्याची परवानगीअसेल. तसेच, यष्टीरक्षकाला आता चेंडू गोलंदाजाच्या हातून सुटतेवेळी फक्त हात स्टंप्सच्या मागे ठेवणे आवश्यक असणार आहे. हे नवे बदललेले नियम आगामी दुलीप चषकापासून लागू होणार आहेत.

# मीराबाई चानू भारताची ध्वजवाहक

| नवी दिल्ली | प्रतिनिधी |

ऑलिम्पिक पदक विजेती मीराबाई चानू आणि लव्हलिना बोरगोहेन यांची ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल खेळांच्या उद्घाटन सोहळ्यासाठी भारताच्या ध्वजवाहक आणि मशालवाहक म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने ही घोषणा केली. मर्यादित स्वरूपात आयोजित करण्यात येत असलेल्या या बहु-क्रीडा स्पर्धेची सुरुवात दि.२३ जुलै रोजी उद्घाटन सोहळ्याने होणार आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी.टी. उषा यांनी मीराबाई चानू आणि लव्हलिना बोरगोहेन यांच्या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, मीराबाई आणि लव्हलिना ओव्हो हायड्रो येथे हा सन्मान स्वीकारणार आहेत, ही अभिमानाची बाब आहे. मी दोन्ही खेळाडूंना आणि संपूर्ण भारतीय पथकाला शुभेच्छा देते. उद्घाटन सोहळ्यासाठी भारतीय संघात दोन महिला खेळाडूंची निवड होणे ही अभिमानाची बाब आहे.



## रेहमत शाह नवा कर्णधार

**नवी दिल्ली** : अफगाणिस्तानने काही दिवसांपूर्वीच भारताचा दौरा केला होता. या दौऱ्यात त्यांना एकमेव कसोटी सामन्यात पराभवाचा धक्का बसला होता, तसेच एकदिवसीय मालिकेतही भारताने अफगाणिस्तानला पराभूत केले होते. त्यानंतर मात्र अफगाणिस्तान संघात मोठा नेतृत्व बदल झाला आहे. हशमतुल्ला शाहिदीने संघाचे एकदिवसीय कर्णधारपद सोडले होते. त्यानंतर आता अफगाणिस्तानने बुधवारी नव्या कर्णधाराची घोषणा केली आहे. ३३ वर्षांच्या रेहमत शाहला कर्णधार म्हणून नियुक्त केले.

## भालाफेकेत रोहितला सुवर्णपदक

| भुवनेश्वर | वृत्तसंस्था |

कलिंगास्टेडियमवरआयोजित ६५ व्या राष्ट्रीय आंतरराज्यीय वरिष्ठ ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम दिवशी भालाफेक स्पर्धेत रोहित यादवची चमक दिसून आली. रोहितने ८७.०५ मीटर भाला फेकून सुवर्णपदक जिंकले. त्यासोबतच, त्याने २०२६च्या आशियाई खेळांसाठीही पात्रता मिळवली. रोहित यादवच्या नावे हा मोठा विक्रम प्रस्थापित झाला आहे. इतकेच नाही तर नीरज चोप्रानंतर तो असा विक्रम करणारा तिसरा भारतीय ठरला आहे.



रविवारी केलेल्या या कामगिरीमुळे, रोहित या हंगामातील भारताचा सर्वाधिक लांब भालाफेक करणारा खेळाडू ठरला आहे. तसेच, श्रीलंकेच्या रमेश थरंगा पाथिरागे (९२.६२ मीटर) यांच्या पाठोपाठ, तो जगातील अव्वल भालाफेकपटूंच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. या यादीत भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा याचाही समावेश आहे, जो ८५.६९ मीटरच्या कामगिरीसह चौथ्या स्थानावर आहे.

# माजी फलंदाज कायद्याच्या कचाट्यात

| सिडनी | वृत्तसंस्था |

ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज डेव्हिड वॉर्नरने, दारू पिऊन गाडी चालवल्याचा गुन्हा कबूल केला आहे. वॉर्नरचे वकील बॉबी हिल यांनी सांगितले की, फलंदाज ईस्टरच्या रविवारी मध्यम प्रमाणात मद्यपान करून गाडी चालवल्याचा आरोप कबूल करत आहे. ''पक्षकार वस्तुस्थितीवर चर्चा करत आहेत,'' असे हिल म्हणाले. ५ एप्रिल रोजी सिडनीत वॉर्नरच्या शरीरात अल्कोहोल असल्याचे निदान झाले. दुसऱ्या चाचणीसाठी मारुब्रा पोलीस स्टेशनमध्ये नेले असता, त्याच्या रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ०.१०४ आढळले, जे कायदेशीर मर्यादेच्या दुप्पटीपेक्षा जास्त होते.



मे महिन्यात जेव्हा हे प्रकरण पहिल्यांदा समोर आले, तेव्हा हिल यांनी गुन्हा कबूल करण्याचे संकेत दिले होते. त्याने जे केले ते चुकीचे होते हे त्याला माहीत आहे. उबर घेण्याऐवजी स्वतःच्या गाडीत बसणे हा एक अविचारी, मूर्खपणाचा निर्णय होता, हे तो मान्य करतो,'' असे हिल म्हणाले. पोलिसांनी त्याची गाडी थांबवण्याच्या ११ मिनिटे आधी वॉर्नरने शेवटचे पेय घेतले होते.

वॉर्नरला पश्चात्ताप झाला होता आणि तो कमी शिक्षेची मागणी करणार होता, परंतु इतर कोणत्याही नागरिकाप्रमाणेच आपल्यालाही शिक्षा होईल अशी त्याची अपेक्षा होती. वॉर्नरच्या या प्रकरणाची अंतिम सुणावणी १८ ऑगस्टला होणार आहे. त्यामुळे त्याने गुन्हा कबूल केल्यामुळे थंडर संघाच्या कर्णधारपदावर शंका निर्माण झाली आहे.

# राष्ट्रकुल स्पर्धांची संख्या घटली

**■ १० खेळांमध्ये पदकांसाठी चुरस**

| ग्लासगो | वृत्तसंस्था |

राष्ट्रकुल खेळाची २३वी आवृत्ती स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे दि.२३ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान आयोजित केली जाणार आहे. ग्लासगो जवळपास १२ वर्षांत दुसऱ्यांदा या खेळांचे आयोजन करणार आहे. परंतु, यावेळी स्पर्धेचे स्वरूप पूर्वीपेक्षा लक्षणीयरीत्या लहान असणार आहे. २०२२ मध्ये बर्मिंगहॅम येथे २० खेळांचा समावेश होता, मात्र यावेळी पदकांसाठी केवळ १० खेळांमध्ये स्पर्धा होणार आहे. यंदाचे राष्ट्रकुल खेळ सुरुवातीला ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्यात आयोजित करण्याचे ठरले होते. २०२२ च्या अखेरीस व्हिक्टोरियाला यजमान म्हणून निश्चित करण्यात आले होते, परंतु खर्च वाढल्यामुळे केवळ नऊ महिन्यांनंतर त्यांनी माघार घेतली. राष्ट्रकुल खेळ महासंघाने घाईघाईने नवीन यजमानाचा शोध घेतला आणि अखेरीस स्कॉटलंडमधील ग्लासगोला यजमान म्हणून निश्चित केले. ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्लासगोला नवीन यजमान म्हणून घोषित करण्यात आले.

# पहिल्यांदाच खाशाबांचा पदकदिन महाराष्ट्रात

| कोल्हापूर | प्रतिनिधी |

राजे साळुंखे चालुक्य राजवंश प्रतिष्ठान व कोल्हापूर जिल्हा व शहर रेसलिंग असोसिएशन संयुक्त विद्यमाने कोल्हापूरात प्रथमच ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचा ७४ वा पदकदिन समारंभ साजरा करण्यात येणार आहे. स्वतंत्र भारतासाठी त्यांनी दि.२३ जुलै १९५२ रोजी कुस्तीत पहिले ऑलिम्पिक पदक जिंकण्याचा पराक्रम केला होता. यानिमित्ताने कोल्हापूरतील श्री दत्त स्पोर्ट्स संकुलामध्ये क्रीडा चर्चासत्र व ऑलिम्पिकवीर खाशाबा पोस्टर प्रकाशन करण्यात येणार आहे.



फिनलंड देशातील हेलसिंकी शहरात झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत कराडच्या खाशाबा जाधव यांनी ४ लढती जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली होती. या खाशाबांच्या अभूतपर्व कामगिरीला उजाळा देण्यासाठी प्रथमच खाशाबा जाधव यांचा ७४ वा पदकदिन कोल्हापूरात साजरा होत असल्याचे राजे साळुंखे चालुक्य राजवंश प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी साळुंखे यांनी सांगितले आहे. यानिमित्त कोल्हापूरतील तालमी व शाळांना खाशाबा जाधवांचे ७५ पोस्टर लेखक संजय दुधाणे यांच्यावतीने भेट देण्यात येणार आहे. तसेच, ''खाशाबा पुन्हा कोल्हापूरात घडण्यासाठी योजना व संकल्प'' या विषयावर चर्चासत्र होणार आहे. हा समारंभ जागतिक विजेती, ऑलिम्पिकपटू नेमबाज तेजस्वीनी सावंत, लेखक, क्रीडा अभ्यासक प्रा. संजय दुधाणे, राजे साळुंखे चालुक्य राजवंश प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी साळुंखे व कोल्हापूर जिल्हा व शहर रेसलिंग असोसिएशनचे अध्यक्ष रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे ज्या दिवशी खाशाबांनी देशासाठी पहिले पदक जिंकले होते, त्याच दिवशी कोल्हापूर खंडपीठात खाशाबांच्या पद्मविभूषणची सुनावणी होणार आहे. तत्पूर्वी, खाशाबांनंतर पदक जिंकलेल्या सर्व ऑलिम्पिक विजेत्यांना पद्म पुरस्काराने गौरवित करण्यात आले आहे. एकमेव खाशाबा या यादीत नाहीत. त्यामुळे दि.२३ जुलै रोजीच्या सुनावणीत पद्मविभूषणवर शिक्कामार्तब झाला, तर तो दुर्मीळ योगायोग असेल, असे लेखक संजय दुधाणे यांनी सांगितले.

**माजी कबड्डी खेळाडूंना आवाहन | क्रीडा क्षेत्राचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न**

# खेळाडू आयोग स्थापनेला सुरुवात

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्यावतीने खेळाडू आयोग स्थापनेच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. या खेळाडू आयोगाचा मुख्य उद्देश असोसिएशनच्या प्रशासनात खेळाडूचे प्रभावी व अर्थपूर्ण प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे, खेळाडू कल्याणाला प्राधान्य देणे. तसेच, पारदर्शकता उत्तरदायित्व, प्रामाणिकता आणि सुशासनाची तत्त्वे अधिक बळकट करणे हा आहे. या आयोगाची स्थापना झाल्यानंतर असोसिएशनच्या प्रशासनामध्ये खेळाडूंना स्वतःचे हित अधिकार व कल्याण यांचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. खेळ प्रशासनामध्ये खेळाडूचा सक्रिय सहभाग वाढविणे व देशातील क्रीडा क्षेत्राचा दर्जा वाढवणे हा राष्ट्रीय क्रीडा अधिनियम २०२५ चा मुख्य उद्देश आहे.

अच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे मार्गदर्शक तत्त्वे व राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ मधील तरतुदी प्रमाणे महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या अंतर्गत क्रीडा आयोगाची स्थापना करण्यात येणार आहे. राज्यातील ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे, तसेच मेजर ध्यानचंद खेलरत्न, अर्जुन पुरस्कार प्राप्त किंवा राष्ट्रीय स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना या क्रीडा आयोगात सहभागी होण्याची संधी प्राप्त होणार आहे. संबंधित खेळाडू हा किमान एक वर्ष अगोदर खेळातून निवृत्त झालेला असावा व खेळाडूचे वय २५ वर्षा पेक्षा जास्त व ७० वर्षांपेक्षा कमी असावे, ही अट अनिवार्य आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनला संलग्न असणाऱ्या जिल्ह्यातील पात्र व इच्छुक माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी १० ऑगस्टपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज भरून राज्य संघटनेच्या अधिकृत ईमेलवर अपलोड करून, संघटनेच शिवाजी पार्क-दादर येथील मध्यवर्ती कार्यालयात दाखल करावेत. प्राप्त अर्जाची छाननी करून, पात्र खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यामध्ये पुरुष व महिला यांना समान संधी राहणार आहे. पात्र ठरलेले खेळाडू महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अधिकृत सभासद होतील व त्यांना या सभेचे सर्व अधिकार प्राप्त होतील.

या योजनेचा राज्यातील जास्तीत जास्त अतिउच्च कामगिरी करणाऱ्या माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग घेऊन असोसिएशनचे प्रशासन अधिक बळकट करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवहान राज्य कबड्डी संघटनेचे प्रभारी अध्यक्ष गजानन कीर्तिकर व प्रभारी सरकार्यवाह माधव गायकवाड यांच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच, अधिक माहितीसाठी संघटनेच्या संकेतस्थळाला खेळाडूंनी भेट द्यावी, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)